ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१२ वा ❑ भारतीय सौर दिनांक २१ आश्विन शके १९४८, गुरूवार दि.१५ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

प्रेम, फसवणूक आणि सक्तीचे धर्मांतर! थाई तरुणीची विदारक कथा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात समाजमाध्यमे जगभरातील लोकांना जोडण्याचे प्रभावी माध्यम बनली आहेत. मात्र, या आभासी जगातील ओळखीवर आंधळा विश्वास ठेवणे किती भयानक आणि जीवघेणे ठरू शकते, याचे एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी उदाहरण उत्तर प्रदेशातील कानपूर शहरात नुकतेच उघडकीस आले आहे. एका भारतीय तरुणाने दोन देशांमधील सीमा ओलांडून थायलंडच्या नागरिक असलेल्या एका निरपराध तरुणीला खोट्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्याशी खोटा विवाह करून तिची प्रचंड मोठी आर्थिक, मानसिक आणि भावनिक फसवणूक केली. हा प्रकार केवळ पैशांची लूट करण्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर सत्य उघडकीस आल्यानंतर तिला बेदम मारहाण करणे आणि बळजबरीने धर्मांतरासाठी सक्ती करण्यापर्यंत या अमानुष प्रकरणाची मजल गेली. या घटनेने ऑनलाईन विवाह आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील फसवणुकीच्या गंभीर समस्येकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधले आहे.

या मन सुन्न करणाऱ्या प्रकरणातील पीडित तरुणीचे नाव अपसॉर्न असून, ती मूळची थायलंड या देशाची रहिवासी आहे. थायलंडमध्ये स्वतःचे एक उपहारगृह आणि कॅन्टीन चालवून ती आपले जीवन सन्मानाने व्यतीत करत होती. काही वर्षांपूर्वी समाजमाध्यमांवरून तिची ओळख कानपूर येथे चामड्याचा व्यवसाय करणाऱ्या इरफान नावाच्या व्यक्तीशी झाली. सुरुवातीला केवळ संवादापुरती मर्यादित असलेली ही ओळख हळूहळू वाढत गेली आणि या संवादाचे रूपांतर घट्ट प्रेमात झाले. इरफानने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने अपसॉर्नचा विश्वास संपादन केला. यासाठी त्याने आपण पूर्णपणे अविवाहित असल्याचे खोटे चित्र तिच्यासमोर उभे केले. तिचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आणि आपल्या खोट्या प्रेमाची खात्री पटवून देण्यासाठी तो थेट थायलंडला गेला. तिथे त्याने तिचा पूर्ण विश्वास जिंकला आणि २ वर्षांपूर्वी थायलंडमध्येच तिच्याशी रीतसर विवाहदेखील केला. आपला पती भारतीय आहे, तो आपल्यावर जीवापाड प्रेम करतो आणि आपला पुढील संसार अत्यंत सुखाचा होईल, अशी अपसॉर्नची भाबडी आणि प्रामाणिक आशा होती.

विवाहानंतर काही काळातच इरफानने आपला खरा स्वार्थ आणि हेतू साध्य करण्यास सुरुवात केली. त्याने भारतातील आपल्या व्यवसायात मोठी आर्थिक अडचण निर्माण झाल्याचे खोटे कारण पुढे करत अपसॉर्नकडे पैशांची वारंवार मागणी करण्यास सुरुवात केली. आपल्या पतीच्या अडचणी दूर करणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेतून अपसॉर्नने त्याला सर्वतोपरी मदत करण्याचे ठरवले. तिने स्वतःच्या उपहारगृहाच्या व्यवसायातून मिळवलेली सर्व जमापुंजी पणाला लावली. एवढेच नाही तर पैशांची कमतरता भासू लागल्यावर तिने स्वतःच्या नातेवाईकांकडून आणि ओळखीच्या लोकांकडूनही पैसे उसणे घेतले. अशा प्रकारे तिने तब्बल ६० लाख रुपये इरफानला पाठवले. मात्र, एवढी प्रचंड मोठी रक्कम हाती पडताच इरफानने आपला रंग बदलला. त्याने अपसॉर्नशी असलेला सर्व संपर्क अचानक तोडून टाकला आणि तो कायमचा भारतात पळून आला.

अनेक महिने उलटून गेले तरी पतीशी कोणताही संपर्क न झाल्याने अपसॉर्न अत्यंत हताश आणि चिंतेत होती. पैशांची चिंता आणि पतीच्या बेपत्ता होण्यामुळे तिने अखेर सत्य शोधण्यासाठी हजारो मैलांचा प्रवास करून भारतात येण्याचा धाडसी निर्णय घेतला. ती ६ ऑक्टोबर २०२६ रोजी थेट उत्तर प्रदेशातील कानपूर शहरात असलेल्या इरफानच्या घरी पोहोचली. मात्र, घरात प्रवेश करताच तिला जो धक्का बसला, तो तिच्या पायाखालची जमीन सरकवणारा आणि तिचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त करणारा होता. ज्या व्यक्तीने तिला स्वतः अविवाहित असल्याचे सांगून तिच्याशी खोटे लग्न केले होते, त्याचे तब्बल १२ वर्षांपूर्वीच लग्न झालेले होते आणि त्याला ३ मुलेदेखील असल्याचे भयानक वास्तव तिच्यासमोर आले. आपले संपूर्ण आयुष्य, आपले प्रेम आणि आपला कष्टाचा पैसा एका मोठ्या कटाचा आणि खोटेपणाचा भाग होता, याची जाणीव तिला त्या क्षणी झाली.

आपली इतकी मोठी आणि भयानक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अपसॉर्नने इरफानला जाब विचारला. तिने आपले कष्टाचे ६० लाख रुपये त्वरित परत देण्याची ठाम मागणी केली. मात्र, स्वतःची चूक मान्य करून पश्चात्ताप व्यक्त करण्याऐवजी इरफानने तिला अत्यंत क्रूरपणे बेदम मारहाण केली. याहूनही संतापजनक आणि धक्कादायक बाब म्हणजे, त्याने तिच्यासमोर अत्यंत अमानुष अटी ठेवल्या. ''जर तुला तुझे पैसे परत हवे असतील किंवा माझ्यासोबत या घरात राहायचे असेल, तर तुला तुझा मूळ धर्म सोडून इस्लाम धर्म स्वीकारावा लागेल आणि इथून पुढे कायमस्वरूपी बुरखा परिधान करावा लागेल,'' अशी अत्यंत घृणास्पद अट त्याने घातली. एका परक्या देशात येऊन असा भयंकर अनुभव आल्याने ती पूर्णपणे कोलमडून गेली. या अमानुष शारीरिक आणि मानसिक छळामुळे त्रस्त झालेल्या अपसॉर्नने हार न मानता न्यायासाठी थेट कानपूरचे अतिरिक्त पोलीस उपायुक्त शिवा सिंह यांचे कार्यालय गाठले. तिथे तिने घडलेला सर्व प्रसंग आणि आपली कैफियत रडत रडत मांडली. एका विदेशी महिलेची इतकी मोठी फसवणूक आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचे हे अत्यंत गंभीर प्रकरण असल्याने पोलिसांनी तातडीने पावले उचलली. पोलिसांनी तत्काळ फसवणूक, मारहाण आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याच्या विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करून आरोपी इरफानला अटक केली आहे. सध्या पोलीस या विवाहाची सर्व कागदपत्रे, ६० लाख रुपयांच्या व्यवहाराचे बँक तपशील आणि धर्मांतरासाठी टाकण्यात आलेला दबाव या सर्व बाबींचा अत्यंत सखोल तपास करत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे ऑनलाईन ओळखींमागील धोके पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत.

साहित्य हे केवळ कलेसाठी नाही, तर मानव्यासाठी असावे-ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र खेर

पुणे पुस्तक जत्रेत चित्रदर्शी कादंबरी लेखन शैलीचे रहस्य उलगडले; 'हसरे दुःख'च्या १७ आवृत्त्या, १५ लाख वाचकवर्ग

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पुणे – ''कादंबरी लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसून, ती वाचकाच्या मनात चित्र उभी करणारी कला आहे. कला केवळ 'कलेसाठी' किंवा 'जीवनासाठी' नसून ती 'मानव्यासाठी' असावी; माणसाच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवणारी असावी,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र खेर यांनी येथे केले.

२४ व्या 'पुणे पुस्तक जत्रे'च्या व्यासपीठावर न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे 'माझा कादंबरी लेखन प्रवास' या विषयावरील विशेष मुलाखतीत ते बोलत होते. प्रसिद्ध लेखक, व पत्रकार योगेश्वर गंधे यांनी ही मुलाखत घेतली. या प्रसंगी लोकमान्य टिळकांच्या वंशज आणि 'केसरी'च्या कल्पना खरे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. 'पुणे पुस्तक जत्रे'चे संयोजक पी. एन. आर. राजन, समन्वयक शिरीष चिटणीस यांसह मोठ्या संख्येने रसिक वाचक उपस्थित होते.

आपल्या मुलाखतीत राजेंद्र खेर यांनी आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली. कादंबरी लेखनापूर्वी त्यांनी क्रिकेटमध्ये अजित वाडेकर योजनेअंतर्गत निवड होऊन १० वर्षे क्रीडा अनुभव घेतला. ना बँकेत नोकरी केली, ना मॉडेलिंग केले.पीडीएमध्ये नाटके केली, तसेच चित्रपट व टीव्ही मालिकांचे सहलेखन आणि दिग्दर्शन केले. वडिलांकडून साहित्यिक व पत्रकारितेचा समृद्ध वारसा लाभला, तर त्यांच्या मातोश्री प्रसिद्ध शास्त्रीय गायिका होत्या. स्वतः खेर हे संवादिनी (हार्मोनियम) व स्वरांचे अभ्यासक असल्याचे त्यांनी सांगितले.

चित्रपट कथा, पटकथा लेखन आणि दिग्दर्शनाच्या अनुभवाचा उपयोग त्यांनी कादंबरी लेखनात केला. ''कथेतील प्रसंग रेंगाळत न ठेवता चित्रपटाच्या शॉट्सप्रमाणे साक्षात् पद्धती वापरणे आणि प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी वाचकाला उत्सुक ठेवणारी 'नॉट' (गाठ) मारणे हे तंत्र मी आत्मसात केले,'' असे ते म्हणाले. वाचकाला गुंतवून ठेवण्यासाठी बुलेटसारखी छोटी, प्रवाही वाक्ये आणि प्रकरणांची नेटकी गुंफण ही त्यांच्या लेखनाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत.

चार्ली चॅप्लीनच्या जीवनावरील 'हसरे दुःख' या कादंबरीच्या १७ हून अधिक आवृत्त्या निघाल्या असून, अनेक वाचकांना या पुस्तकामुळे हताशेतून बाहेर पडून संघर्ष करण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. 'देह झाला चंदनाचा' (स्वाध्याय परिवारावर आधारित), 'दिग्विजय' (ऐतिहासिक कादंबरी), अर्जुनावरील 'धनंजय', 'गीतांबरी', 'देवांच्या राज्यात', 'अवेकनिंग' आणि 'कर्म सिद्धांत' ही त्यांची प्रमुख पुस्तके आहेत. त्यांच्या 'गीतांबरी'च्या इंग्रजी अनुवादाची माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी पत्राद्वारे विशेष प्रशंसा केली होती, हे विशेष.

आपल्या साहित्याला मोठा तरुण वाचकवर्ग लाभल्याचे सांगताना खेर म्हणाले, ''तरुणांना भावनिक विधानांपेक्षा संदर्भयुक्त, बुद्धिनिष्ठ आणि तर्कशुद्ध मांडणी आवडते.'' मोठ्या जाहिरातींऐवजी वाचकांनी एकमेकांना सुचवलेल्या शिफारशींमुळे ('माऊथ पब्लिसिटी') त्यांच्या पुस्तकांच्या हजारो प्रती खपतात; १५ लाखांहून अधिक वाचकवर्ग त्यांच्या साहित्याशी जोडला गेला आहे.

वडिलांनी दिलेल्या 'पात्रता मापक पट्टी'चा मंत्र सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, कितीही प्रसिद्धी व सन्मान मिळाले तरी कालिदासांसारख्या दिग्गजांच्या तुलनेत स्वतःचे पाय नेहमी जमिनीवर ठेवावेत. नवोदित लेखकांना त्यांनी साहित्यामध्ये पूर्ण निष्ठा व परिश्रम ओतून काम करण्याचा, तसेच मान-सन्मानापेक्षा निर्मितीच्या दर्जावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला.

प्रमुख पाहुण्या कल्पना खरे यांनी



आपल्या मनोगतात 'पुणे पुस्तक जत्रे'च्या प्रतिष्ठित मंचावर निमंत्रित केल्याबद्दल संयोजक राजन आणि शिरीष चिटणीस यांचे मनःपूर्वक आभार मानले.बालपणीच्या आठवणींना उजाळा देताना त्या म्हणाल्या की, त्यांचे वडील नानासाहेब साठे यांनी लहानशा घरात भिंतीतील मोठ्या कपाटांमध्ये धार्मिक, अध्यात्मिक, गणित, चरित्रे आणि होमियोपॅथी अशा विविध विषयांवरील ग्रंथसंपदा जतन केली होती, ज्यामुळे लहानपणीच वाचनाची आवड निर्माण झाली. विशेषतः झाशीची राणी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुस्तकांनी व चरित्रात्मक साहित्याने त्यांच्या बालमनावर विशेष प्रभाव पाडला.

मराठी साहित्यात चरित्रात्मक कादंबरी निर्मितीमध्ये भा. द. खेर यांचे योगदान मोलाचे असून त्यांनी सुमारे २५ वर्षे 'केसरी'चे सहसंपादक म्हणून काम केल्याचे कल्पना खरे यांनी नमूद केले. भा. द. खेर यांचा हा समृद्ध साहित्यिक वारसा त्यांचे सुपुत्र ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र खेर अत्यंत समर्थपणे पुढे चालवत आहेत, हे कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पवित्र वास्तूत बोलताना कल्पना खरे यांनी लोकमान्य टिळकांच्या अनोख्या पुस्तकप्रेमाची आठवण सांगितली. पूर्वी लग्नानंतर आषाढ महिन्यात जावयाला 'आषाढ पाटी'चे वान देण्याची प्रथा होती. सासऱ्यांनी लोकमान्यांना काय खाऊ हवा असे विचारले असता, लोकमान्यांनी तात्काळ ''मला खाऊ नको, तर पाटी भरून पुस्तके द्या!'' असे सांगितले आणि मिळालेली ती पाटीभर पुस्तके त्यांनी पूर्ण वाचून काढली. पुणेकरांचे पुस्तकांवरील प्रेम सर्वश्रुत असल्याचे नमूद करत त्यांनी राजेंद्र खेर यांच्या समृद्ध साहित्यिक प्रवासाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता व्यक्त केली.

'पुणे पुस्तक जत्रे'चे समन्वयक शिरीष चिटणीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, यंदाच्या जत्रेत ६१ स्टॉल्स असून ६० हजारांहून अधिक पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी उपलब्ध आहे. मराठी वृत्तपत्रसृष्टी आणि स्वातंत्र्यलढ्यात 'केसरी'चे योगदान ऐतिहासिक असून, पुस्तक जत्रेमध्ये वाचक व अभ्यासकांसाठी 'केसरी'चा स्वतंत्र स्टॉल उपलब्ध करून देण्यात आला आहे. कल्पना खरे या लोकमान्य टिळकांच्या नातसून आणि 'केसरी'च्या विश्वस्त असून, 'साठे बिस्कूट'चे नानासाहेब साठे यांच्या कन्या असल्याने साठे आणि टिळक या दोन्ही घराण्यांचा समृद्ध वारसा त्या पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुलाखतकार योगेश्वर गंधे यांचा परिचय देताना चिटणीस म्हणाले की, त्यांना ३५ वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव असून भारत आणि मॉरिशस यांच्यातील सांस्कृतिक संबंध जोडण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. राजेंद्र खेर यांच्यासारख्या सिद्धहस्त व अभ्यासू लेखकांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यास, मराठी भाषेचा आणि साहित्याचा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रविवारी प्रदर्शनाचा अंतिम दिवस असल्याने जास्तीत जास्त पुणेकर वाचकांनी पुस्तक जत्रेला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

'पुणे पुस्तक जत्रे'चे संयोजक पी. एन.आर. राजन यांनी आपल्या स्वागत मनोगतात सांगितले की,२००० साली' पुणे पुस्तक जत्रे'ची सुरुवात झाली. दरवर्षी ५ दिवसांचे पुस्तक प्रदर्शन आणि त्याला जोडून ५ दिवसांचे साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमाला उपस्थित सर्व रसिक वाचक आणि मान्यवरांचे मनःपूर्वक त्यांनी स्वागत केले. नव्या पिढीशी संवाद साधण्याची आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याची व वाचनाची आवड निर्माण करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या शेवटी शिरीष चिटणीस यांनी उपस्थितांचे आभार मानत राजेंद्र खेर यांच्या मुलाखतीची सूत्रे योगेश्वर गंधे यांच्याकडे सुपूर्द केली. या मुलाखतीने उपस्थित वाचकांना कादंबरी लेखनाच्या अंतर्गत बारकाव्यांची आणि चित्रदर्शी शैलीची सविस्तर ओळख करून दिली, तसेच साहित्याचे खरे ध्येय 'मानव्यासाठी कला' हेच असल्याचा संदेश दिला.

क्रांती नवदुर्गांची....

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

महाराष्ट्राच्या मातीला नेहमीच क्रांतीचा आणि समाजसुधारणेचा सुगंध राहिला आहे. ज्या समाजात स्त्रियांना चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित ठेवले गेले होते, तिथेच काही तेजःपुंज व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहास घडवला. नवरात्राच्या पावन पर्वावर, स्त्री शक्तीचा जागर करताना, महाराष्ट्रातील अशा नऊ नवदुर्गांचा हा प्रवास, ज्यांनी खरोखरच स्त्री जीवनात क्रांती घडवून आणली!

उंबरठा ओलांडून ज्यांनी
आभाळाला गवसणी घातली,
त्यांच्याच त्यागाने आज
स्त्री जगताची पहाट झाली...
तलवार नाही, तर ज्ञानाची अन्
कर्तृत्वाची ढाल ज्यांनी धरली,
महाराष्ट्राच्या मातीत
अशा नवदुर्गांची क्रांती घडली!

१. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले:
महाराष्ट्रातील पहिली स्त्री क्रांती सावित्रीबाईंच्या रूपाने झाली. अनंत अपमान, अंगावर फेकलेला शेण-गोटा सोसून त्यांनी भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्या केवळ पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर हजारो वर्षांच्या अंधाराला चिरून ज्ञानाचा प्रकाश देणाऱ्या खऱ्या क्रांतिज्योती होत्या.

२. पंडिता रमाबाई: अफाट बुद्धिमत्ता आणि पंडिता ही पदवी सन्मानाने मिळवणाऱ्या रमाबाईंनी स्त्रियांच्या हक्कांसाठी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांनी स्थापन केलेले शारदा सदन आणि मुक्ती



मिशन म्हणजे निराश्रित, बालविधवा आणि उपेक्षित स्त्रियांना सन्मानाने जगण्याचे बळ देणारे हक्काचे घर ठरले.

३. भारतरत्न लता मंगेशकर:
प्रतिकूल परिस्थितीशी लढा देत लतादीदींनी संगीत क्षेत्रात स्वतःचे अढळ साम्राज्य निर्माण केले. त्यांचे गाणे ही केवळ कला नव्हती, तर जागतिक स्तरावर भारतीय स्त्रीच्या सामर्थ्याची आणि अस्तित्वाची ती एक सुरेल मोहोर होती, जिने अवघ्या जगाला भुरळ घातली.

४. डॉ. आनंदीबाई जोशी:
ज्या काळात स्त्रियांनी उंबरठा ओलांडणेही पाप मानले जाई, त्या काळात आनंदीबाईंनी थेट अमेरिकेत जाऊन वैद्यकीय पदवी मिळवली. प्रचंड शारीरिक व्याधी, समाजाचा विरोध आणि अपार कष्ट झेलून त्यांनी घेतलेली झेप

सौ. भामिनी महाले
पिंपळे सौदागर, पुणे.
मो. 9588691023



म्हणजे भारतीय वैद्यकीय क्षेत्रातील स्त्री क्रांतीचे पहिले पाऊल होते.

५. क्रांतीअग्रणी ताराबाई शिंदे:
स्त्री-पुरुष तुलना हा ग्रंथ लिहून एकोणिसाव्या शतकात त्यांनी पुरुषप्रधान संस्कृतीच्या भिंतींना हादरवून सोडले. स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या आत्मसन्मानासाठी अत्यंत परखड आणि निर्भीडपणे लेखणी चालवणारी महाराष्ट्रातील ही पहिली बंडखोर विचारवंत ठरली.

ना खचल्या कधी संकटांना,
ना कधी त्या थांबल्या,
अन्यायाविरुद्ध लढताना,
वाघिणीसारख्या त्या ठाकल्या!
त्यांच्याच या सामर्थ्याने आज
प्रत्येक स्त्रीचा अभिमान जागा झाला,
स्त्री शक्तीच्या या प्रवासाला,
साऱ्या जगाने मुजरा केला!

६. सिंधुताई सपकाळ:
स्वतःचे आयुष्य संघर्षाच्या आणि वेदनेच्या भट्टीत होरपळून निघालेले असताना, सिंधुताईंनी हजारो अनाथ मुलांचे मातृत्व स्वीकारले. माई म्हणून त्यांनी केवळ मुलांचे संगोपन केले नाही, तर समाजातील दुर्लक्षित घटकाला जगण्याची नवी उमेद दिली. त्यांचे मातृत्व हे चंडीकेच्या रूपासारखेच महान होते.

७. सुमतीबाई मोराजी:
पुरुषी मक्तेदारी असलेल्या जागतिक नौकानयन क्षेत्रात सुमतीबाईंनी आपले कर्तृत्व गाजवले. सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे नेतृत्व करत त्यांनी भारताचे नाव जगभरात समुद्राच्या लाटांवर कोरले. त्या खऱ्या अर्थाने आधुनिक काळातील धैर्याचे आणि व्यावसायिक नेतृत्वाचे प्रतीक होत्या.

८. डॉ. मंदाकिनी आमटे:
हेमलकशाच्या घनदाट जंगलात, जिथे साधी वीज आणि रस्ते नव्हते, तिथे जाऊन डॉ. मंदाकिनी आमटे यांनी आदिवासींच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्या आदिवासी बांधवांच्या अंधारमय जीवनात क्रांती घडवून आणणाऱ्या प्रकाशवाटा बनल्या.

९. कल्पना चावला:
जरी कल्पना चावला यांचा जन्म हरियाणामध्ये झाला असला, तरी महाराष्ट्राचे सूनबाईपद भूषवणाऱ्या या कन्येने अंतराळात झेप घेणारी पहिली भारतीय महिला म्हणून इतिहास रचला. त्यांनी जगातील प्रत्येक मुलीला स्वप्न पाहण्याचे आणि ते पूर्ण करण्याचे प्रचंड धाडस आणि पंख दिले.

या नऊ नवदुर्गा म्हणजे केवळ इतिहासातील नावे नाहीत, तर त्या स्त्री शक्तीच्या जिवंत मशाली आहेत. त्यांनी रचलेल्या क्रांतीच्या पायावरच आजची आधुनिक स्त्री सन्मानाने आणि ताठ कण्याने उभी आहे. जेव्हा जेव्हा स्त्री शक्तीवर संकट आले, तेव्हा तेव्हा महाराष्ट्राच्या या दुर्गांनी ज्ञान, सेवा, त्याग आणि धैर्याचे शस्त्र उपसले.

ज्योतिर्मय अंकाच्या माध्यमातून आज या स्त्री शक्तीचा जागर करताना, आपल्याला केवळ त्यांच्या कार्याचे गुणगान करायचे नाही, तर त्यांच्या विचारांचा वारसा पुढे न्यायचा आहे. प्रत्येक स्त्रीच्या मनात एक दुर्गा दडलेली असते; गरज आहे फक्त तिच्यातील त्या सुप्त शक्तीला आणि स्वाभिमानाला जागे करण्याची. महाराष्ट्राच्या या नऊ महाशक्तींना आणि त्यांच्या क्रांतीला मानाचा मुजरा!

स्त्री शक्तीचा हा जागर असाच अखंड तेवत राहो!




जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
पान्हा पदरात आला
अमृताचे थेंब ओठी
बाळ पिऊन वाढला ॥८८९॥

माय माऊलीची माया
तुझी काढती घाण
लाळ, शेंबुड पदरात
तिला फक्त तुझ ध्यान ॥८९०॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७९



ज्योतिर्मय साहित्य

ही चिंता का टाकून द्यायची ? कारण जी गोष्ट मुळात नाहीच आहे, तिच्याबद्दल चिंता करून काय उपयोग ? मोहमायेमुळे हा संसार आपल्याला खरा वाटतो. त्याची भूल आपल्याला पडते. पण खऱ्या सत्यापासून आपण लांब जातो. वाळवंटातील तहानलेल्या माणसाला मृगजळ दृष्टीस पडते. तिथे आपल्याला नक्कीच पाणी मिळेल या आशेने तो त्याच्या शोधात पुढे पुढे जात राहतो. शेवटी त्याला लक्षात येते की आपल्याला जे पाणी वाटले होते, ते तर केवळ मृगजळ ! मृगजळ म्हणजे भ्रम. पाणी नाही हे सत्य. त्याप्रमाणेच हा संसार ! खरा वाटतो पण अखेरीस त्याची व्यर्थता लक्षात येते. खरी वस्तू एकच. ती म्हणजे भगवंताचे नाम. ते नाम पवित्र करणारे आहे. सत्याची जाणीव करून देणारे आहे. संसाराची व्यर्थता लक्षात आणून देणारे आहे. म्हणून हे मना, असे पवित्र नाम तू हृदयात धारण कर आणि संसाराची व्यर्थ चिंता सोडून दे. जी गोष्ट मुळात नाहीच तिची चिंता करण्यात काय अर्थ ?



तुकाराम महाराज म्हणतात,''हेचि थोर भक्ती आवडते देवा, संकल्पावी माया संसाराची.'' भक्ती करणे म्हणजे जी गोष्ट आपल्याला अत्यंत प्रिय असते, ती परमेश्वराला अर्पण करावी. संसार, मुलेबाळे या गोष्टी आपल्या अत्यंत प्रिय असतात. त्यांच्यावर आपले जीवापाड प्रेम असते. हेच प्रेम भगवंताला अर्पण करावे. आणि भगवंताचे प्रेम अंतर्यामी धारण करावे.

स्वसंवाद :


१. ज्या शिक्षण, नोकरी, संपत्ती किंवा नात्यांना मी माझ्या जीवनाचे सार्थक मानून बसलो आहे, ते खरंच चिरंतन सत्य आहे की केवळ एक तात्पुरता भ्रम (मृगजळ) आहे?


२. ''म्हातारपणी माझे कसे होईल? मुले मला सांभाळतील ना?'' अशा भविष्यातील भवाच्या (संसाराच्या) व्यर्थ चिंतांमध्ये मी माझा आजचा दिवस आणि मनाची शांतता गमावत आहे का?


३. माझ्या अंतर्मनात साचलेला बऱ्या-वाईट वासनांचा कचरा साफ करण्यासाठी मी पतितांना पावन करणाऱ्या राघवाच्या नामाचा आश्रय किती वेळा घेतो?

४. तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, मी प्रपंचातील माझी सर्व आसक्ती आणि प्रेम भगवंताच्या चरणी अर्पण करून निर्वासन भक्तीचा अनुभव घ्यायला तयार आहे का?

(क्रमशः)







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नाम हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।

ज्योतिर्मय साहित्य

संसारातील सार । आपला करावा रघुवीर ।। कलि अत्यंत मातला। नीतिकर्तव्याचा विसर पडला ।। अनाचार होतसे फार । आता नाही रामावाचून दुजा ठाव ।। चोराने घरफोड केले । मग जागृतीचे कारण नाही उरले ।। म्हणून असावी सावधान वृत्ति । अखंड राखावी भगवंताची स्मृति।। भगवंतासी अनन्य होता । दुःखाची नाही तेथे वार्ता ।। अभिमानवृत्ति सोडावी बरी । त्यास घडे रामसेवा खरी ।। सरे मीपणाची उरी। ब्रह्मरूप दिसे चराचरी ।। म्हणून ज्याने जन्माला घातले । ज्याने आजवर रक्षण केले ।। तो माझा धनी हे ठेवून चित्ती । भावे भजावा रघुपति ।। रामाचे व्हावे आपण । राम जोडावा आपण ।। हेच जन्माचे । प्रपंचाचे, मुख्य कारण ।। म्हणून रामाविण न मानी कोणी त्राता । धन्य त्याची माता पिता ।। प्रपंच तसा परमात्म्यावाचून। हे जसे अलंकार सौभाग्यावाचून ।। अलंकार सर्व घातले । पण सौभाग्यतिलक न लावले । तैसे रामाविण राहणे । आहे खरे ।। ऐहिक आणि पारमार्थिक । न जाणावे एकाहून एक परते ।। ऐहिक आणि पारमार्थिक सुख। रामावाचून नाही देख ।। म्हणून शुद्ध असावे आचरण । तसेच असावे अंतःकरण । त्यात भगवंताचे स्मरण । हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।।

रामचरणावर ठेवावा विश्वास । हेच परमार्थाचे भांडवल खास ।। ऐहिक वागण्यात रामाचे स्मरण । हीच परमार्थाची खरी शिकवण ।। माझे हित भगवंताचे हाती । हीच ठेवावी मनाची प्रवृत्ति।। राम कर्ता ही असावी भावना । तो जे करील ते आपल्या हिताचे जाणा ।। भाव ठेवावा रामापायी। पण व्यवहार चुकू न देई ।। परमात्म्याचे राखणे अनुसंधान । हाच परमार्थाचा मुख्य मार्ग जाण ।। बाह्यांगाने करावी प्रपंचाची संगति । चित्ती असावा एक रघुपति ।। प्रयत्न करणे आपल्या हाती। यश देणे भगवंताचे हाती ।। प्रयत्नाला न पाहावे पुढे मागे । परि परमात्मा उभा आहे मागे। ही ठेवावी जाणीव मनामध्ये ।। प्रपंचात दक्षतेने वागत जावे । धीर सोडू नये । भगवंताचे आधारावर निभ्रांत असावे ।। सर्व कामधंदा घरी करी । पण चित्त लेकरांवरी । ऐसे जैसे करी जननी जाण। तैसे वागावे आपण । काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात । नीतिधर्माचे आचरण । पवित्र असावे अंतःकरण । त्यात कर्तव्याची जोड पूर्ण । त्या सर्वात राखता आले अनुसंधान । तर याविण दुजा परमार्थ नाही जाण ।। व्यवहार उत्तम प्रकारचा केला । पण परमात्मा विसरला । तो व्यवहार दुःखच देता झाला ।।


जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.







॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

पैल मेरू चे शिखरी

ज्योतिर्मय साहित्य

पैल मेरू चे शिखरी
एक योगी निराकारी
मुद्रा लावोनी खेचरी
प्राणायामे बैसला
तेणे सांडीयेली माया
त्यजीयेली कंथा काया
मन गेलेसे विलया
ब्रम्हानंदा माझारी
अनुहत ध्वनी नाद
तो पावला परम पद
उन्मनी तुर्या विनोद
छंदे छंदे डुल्लतसे
स्नान गोदावरीचे तिरी
ध्यान केले पांचाळेश्वरी
ज्ञानदेवाचे अंतरी
दत्तात्रेय योगी हा

गोदातीरावरील जन्मस्थान असलेले आपेगाव येथील रहिवासी संत ज्ञानेश्वर यांनी पांडुरंगाच्या श्रीकृष्णाच्या भक्ती मध्ये अनेक पद्यरचना अभंग यांची रचना केली दत्त संप्रदायाबद्दल कमी अभंग त्यांनी लिहिले आहेत. त्यातील एक महत्त्वाचा अभंग म्हणजे ''पैल मेरू चे शिखरी...''

या अभंगांमध्ये गोदातीर व बीड जिल्ह्यातील तीन स्थानांचा उल्लेख आढळतो ''परळी वैद्यनाथ शहरातील मेरू पर्वत'' आज ही मेरू पर्वत नावाने उंच टेकडी अस्तित्वात आहे.



''श्री क्षेत्र राक्षस भुवन येथे गोदावरी नदीत स्नान संध्या पांचाळेश्वर येथे ध्यान धारणा'' असा नित्य क्रम आचरीत हा उल्लेख या परिसराचा अन दत्त संप्रदाया चा संबंध अधोरेखित करतो.

शके सोळाशे मध्ये वर्ष प्रतिपदेला जन्म झालेले एक दत्तावतारी सतपुरुष ''दत्ता स्वामी उर्फ भाऊ स्वामी महाराज'' यांनी प्रकाशात आणलेले व त्या स्थानी साधना करून जे आद्यपीठ वरद दत्त संस्थान स्थापित केले ते आजवरही दत्तसेवा अखंडित आचरित आहेत.

राक्षसभुवन येथील ''श्री दत्त यंत्रासह वालुके ची एकमुखी षडभुज प्राचीन मुर्ती'' याची साक्ष देते.

खोल गर्भ गृहात शिखर विरहित ''वरददत्त'' मुर्ती आजही विराजित आहे.

तसेच ''पंचाळेश्वर'' येथे ही दत्त संप्रदाया चा एक धागा ''महानुभाव संप्रदायी'' रक्षण करीत आहेतच. तेथे ही माध्यन्ह भिक्षा फ ेरी असते. अशी भाविकांची अढळ श्रद्धा आहे. प्राचीन दत्त स्थाने व त्यांची माहिती दत्त भक्तांना व्हावी ही इच्छा.

गुरुदेव दत्त कृपा करा. ***



कृष्मांडा

कृष्मांडा देवीचे निवासस्थान
सूर्यमंडळात खरे मनोभावे
देवीची आराधना करावी
देवीच्या भक्तीमुळे आयुष्य,
यश, शक्तीसह आरोग्याची
काळजी दूर व्हावी

देवीला शरण जाता
शांती आणि समृद्धीने
जीवनी प्रगती साधावी
कृष्मांडा देवीच्या उपासनेमुळे
भक्तांनी शारीरिक,मानसिक
आजारावर मात करावी

अमृतच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना तहसील प्रशासनाचे धडे

ज्योतिर्मय साहित्य

खामगाव, जि. बुलढाणा – महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी यांच्या वतीने खामगाव येथे विद्यार्थ्यांना तहसील प्रशासनाच्या कामकाजाची माहिती करून देण्यासाठी विशेष मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शासकीय विभागांची कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी होण्याची प्रेरणाही मिळाली.

या कार्यक्रमात खामगावचे तहसीलदार श्री. सुनील पाटील साहेब आणि नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तहसील कार्यालयामार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा, शासकीय दाखले मिळविण्याची प्रक्रिया आणि प्रशासनाचे दैनंदिन कामकाज याविषयी संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली.

शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व्हावा, विद्यार्थ्यांना शासकीय यंत्रणेची प्रत्यक्ष ओळख व्हावी आणि विविध शासकीय सेवांचा लाभ



घेण्यासाठी योग्य माहिती मिळावी, या उद्देशाने अमृतच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रत्यक्ष प्रशासनाची कार्यपद्धती समजून घेणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

यावेळी तहसीलदार श्री. सुनील पाटील साहेब यांनी अमृतच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांपर्यंत शासकीय कामकाजाची माहिती पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तहसीलदार साहेब आणि नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आणि परीक्षांची तयारी करण्यासाठी प्रेरित केले. जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त आणि लोकसेवेची भावना जोपासल्यास प्रशासकीय सेवेत यश मिळविण्याच्या दिशेने वाटचाल करता येते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाला अमृतचे जिल्हा व्यवस्थापक श्री. जिग्नेश कमानी, जे. व्ही. मेहता महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी, मेश्राम सर आणि ठाकूर मॅडम उपस्थित होते.

अमृतच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शासकीय प्रशासन समजून घेण्याची, आपल्या हक्कांविषयी जागरूक होण्याची आणि भविष्यात प्रशासकीय अधिकारी बनण्याचे ध्येय निश्चित करण्याची प्रेरणा मिळाली. शासनाच्या विविध सुविधा आणि योजनांची माहिती समाजातील पात्र घटकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच युवकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दिशेने अमृतचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

अमृतचा संकल्प – शासकीय योजनांची माहिती, युवकांना योग्य दिशा आणि सक्षम भविष्याची निर्मिती!

अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक श्री जिग्नेश कमाणी यांच्या सोबत संपर्क करावा ९११२२२७६३७, जिल्हा कार्यालय, अमृत जिल्हा कार्यालय फ्लॅट नंबर ३०५, तिसरा मजला बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालय समोर बुलढाणा ४४३००१.

कार्यक्रमादरम्यान अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल), उत्पन्नाचा दाखला, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, पुरवठा विभाग, नैसर्गिक आपत्ती विभाग, सेतू विभाग आणि निवडणूक विभाग या विविध विभागांच्या कार्यपद्धतीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. संबंधित शासकीय सेवा मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्जप्रक्रिया आणि नागरिकांनी घ्यावयाची दक्षता याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

भारतीय मजदूर संघाचे दोन प्रतिनिधी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी बँकॉकला रवाना

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई/पुणे – भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय सचिव ॲड. अनिल धुमणे आणि सह-उद्योग प्रभारी श्रीमती शर्मिला पाटील यांची आंतरराष्ट्रीय कामगार प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड झाली असून, ते आज बँकॉक, थायलंड येथे रवाना झाले आहेत. दि. १२ ते १६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमात ते भारतीय मजदूर संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

ILO-ITC आणि JILAF यांच्या माध्यमातून आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचे विषय दूरस्थ कामाच्या संदर्भातील रोजगार व औद्योगिक संबंध) आणि मानवी हक्कविषयक योग्य दक्षता, सामाजिक संवाद आणि जीवननिर्वाहयोग्य वेतन यांच्या माध्यमातून कामगार संघटनांच्या रणनीतीचे नूतनीकरण) असे आहेत.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून दि. २१ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या ऑनलाइन प्रशिक्षणात सहभागी झालेल्या निवडक प्रतिनिधींना बँकॉक येथे होणाऱ्या प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. त्यामध्ये भारतीय मजदूर संघाच्या दोन प्रतिनिधींची निवड होणे ही संघटनेसाठी महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे.

ॲड. अनिल धुमणे हे भारतीय मजदूर संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते असून, अखिल भारतीय सचिव म्हणून राष्ट्रीय स्तरावर कामगारांच्या प्रश्नांवर कार्यरत आहेत. विविध उद्योगांतील वेतनवाढ करार, कामगार आंदोलने, कामगारविषयक कायदेशीर बाबी तसेच लेबर कोडसंदर्भातील धोरणात्मक अभ्यास यांचा त्यांना व्यापक अनुभव आहे. कामगारांचे हक्क व हितसंबंध यांच्या संरक्षणासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

श्रीमती शर्मिला पाटील या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) प्रकाशगड येथील मुख्य कार्यालयात कार्यरत होत्या. त्या



नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. कामगार महासंघाच्या पदाधिकारी म्हणून त्यांनी विविध कामगार आंदोलने, वेतनवाढीच्या वाटाघाटी, महिला कामगारांचे प्रश्न तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्यांवर महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांना कामगार संघटनात्मक कार्याचा प्रदीर्घ अनुभव आहे.

सध्याच्या बदलत्या रोजगार व्यवस्थेत दूरस्थ काम, कामगारांचे अधिकार, मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक संवाद आणि जीवननिर्वाहासाठी पुरेसे वेतन हे विषय अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत. या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणाच्या माध्यमातून विविध देशांतील कामगार संघटनांच्या कार्यपद्धती, अनुभव आणि रणनीती यांची माहिती मिळणार आहे. या प्रशिक्षणातून प्राप्त होणारे ज्ञान आणि अनुभव भारतातील कामगार चळवळीला अधिक सक्षम करण्यासाठी तसेच कामगारांचे हक्क, न्याय्य वेतन आणि औद्योगिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

भारतीय मजदूर संघाच्या दोन प्रतिनिधींची या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमासाठी झालेली निवड ही संघटनेच्या कार्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब असून, त्यांच्या सहभागामुळे राष्ट्रीय कामगार चळवळीला आंतरराष्ट्रीय अनुभव आणि नवी दिशा मिळण्यास मदत होईल . या संदर्भात माहीती भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे यांनी दिली आहे.

शालेय जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींचे घवघवीत यश!

अंतिम सामन्यात डॉ. जी. डी. बेंडाळे कनिष्ठ महाविद्यालयाचा पराभव; १९ वर्षाखालील गटात विजेतेपदावर मोहोर

ज्योतिर्मय साहित्य

जळगाव / गोकुळसिंग राजपूत – शालेय जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत दिमाखदार विजय मिळविला. १९ वर्षांखालील वयोगटातील अंतिम सामन्यात डॉ. जी. डी. बेंडाळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाचा पराभव करून स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींनी विजेतेपद पटकावले. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली आहे.

स्पर्धेदरम्यान संघातील खेळाडूंनी सांघिक समन्वय, जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट



खेळकौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाला आव्हान दिले. अंतिम सामन्यातही खेळाडूंनी आत्मविश्वासाने खेळ करत विजय मिळविला आणि महाविद्यालयाचे नाव जिल्हास्तरावर उंचावले.

विजयी संघातील खेळाडू

स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विजयी संघात पुढील खेळाडूंचा समावेश होता.

१. खुशबू चव्हाण, अनुष्का सहा, आकांक्षा महाजन, संस्कृती बोरसे, शामल भावसार, ताशी गांधी, मोक्षदा चव्हाण, कशिश गोठवाल, श्रद्धा पाटील, मोनिका बोरसे वैष्णवी सोनार. या यशस्वी कामगिरीसाठी महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील यांचे खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सराव, शिस्त आणि सांघिक भावनेच्या बळावर स्पर्धेत यश संपादन केले.

महाविद्यालयाकडून खेळाडूंचे अभिनंदन


या उल्लेखनीय यशाबद्दल एम.जे. स्वायत्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. श्री. केतन नारखेडे, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. श्री. आर. बी. ठाकरे, समन्वयक प्रा. सौ. स्वाती बऱ्हाटे, उपप्राचार्या प्रा. सौ. राजश्री महाजन, पर्यवेक्षिका प्रा. सौ. शिल्पा सरोदे, कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. श्री. उमेश पाटील, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. श्री. गुणवंत वंजारी तसेच जिमखाना समितीच्या चेअरमन प्रा. सौ. वर्षा पाटील यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले

नवरात्र निमित्त पिंपळे सौदागर मध्ये रक्तदान शिबीर

ज्योतिर्मय साहित्य


पुणे – पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशन , लायन्स क्लब ऑफ पिंपळे सौदागर आणि पिंपरी चिंचवड येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चर यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवानिमित्त सलग तिसऱ्या वर्षी रक्तदान शिबिर घेण्यात आले.

कुंजीर चौकाजवळील उन्नतीच्या प्रांगणात मंगळवार दि. १३ रोजी झालेल्या या शिबिरात जवळपास पन्नासजणांनी रक्तदान केले. या सर्व रक्तदात्यांची उंची आणि वजन मोजण्यात येऊन त्यानुसार त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शनही करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समिती सदस्या तथा पिंपळे सौदागर




प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झालेल्या या शिबिरास उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, लायन्स क्लबचे अध्यक्ष संजय सोनार, झोनल चेअर पर्सन लॉ. बालाजी जगताप पिंपरी चिंचवड आर्किटेक्चर संघटनेचे अध्यक्ष ऋषीकेश देवरे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सचिव सखाराम ढाकणे, उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी, पदाधिकारी दिलिप चौगुले, रमेश चांडगे, आनंद हास्य क्लबचे बाळकृष्ण चौधरी आदींची प्रमुख उपस्थिती होती. आधार ब्लड सेंटरच्यावतीने रक्त संकलन करण्यात आले.











शाळा आणि नवरात्र...

ज्योतिर्मय 📖 साहित्य

ऐलमा पैलमा गणेश देवा
माझा खेळ मांडू दे
करी तुझी सेवा...

एक लिंबू झेलू बाई, दोन लिंब झेलू..

ही नवरात्रातील भोंडल्याची गाणी आठवली म्हणजे नवरात्र जवळ आलं असं समजायचं.

नवरात्र म्हणजे केवळ देवीची आराधना किंवा गरबा-दांडिया आणि रंगीबेरंगी पोशाखांचा उत्सव नाही; तर स्त्रीशक्तीचा, संस्कारांचा, आत्मविश्वासाचा आणि चांगल्या विचारांचा जागर आहे. शालेय मुलींना सुसंस्कार देण्यासाठी मशाळेत नवरात्र साजरे करतात.त्यामागील भावना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असते म्हणून ठिकठिकाणी शालेय भोंडला घेतला जातो.

शाळा म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे सरस्वती मंदिर नाही तर शाळा म्हणजे संस्कारांची शिदोरी देणारे मंदिर आहे. मुलांच्या कोवळ्या वयात संस्कारांचे बीजरोपण लवकर होते. त्यासाठी शाळेमध्ये प्रत्येक महिन्यांचे सण साजरे केले जातात. त्यातीलच नवरात्र म्हणजेच भोंडला शाळेत साजरा केला जातो.

मुलांच्या मनात चांगले विचार, शिस्त, सहकार्य, समानता, संवेदनशीलता, समाजसेवा आणि आत्मविश्वास रुजवण्याचे काम शाळेत केले जाते. नवरात्र हा यासाठी एक सुंदर निमित्त ठरतो. नऊ दिवस देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. या प्रत्येक रूपातून विद्यार्थ्यांना एखादा जीवनमूल्याचा संदेश दिला जातो. उदा -शैलपुत्रीमधून धैर्य, ब्रह्मचारिणीमधून संयम, चंद्रघंटेतून सजगता, कूष्मांडेतून सकारात्मकता, स्कंदमातेतून माया, कात्यायनीमधून शक्ती, कालरात्रीतून संकटांशी सामना करण्याची हिंमत, महागौरीतून पवित्रता आणि सिद्धिदात्रीमधून ज्ञान व सिद्धी असा सुंदर संस्कारमय प्रवास शाळेत घडवता येतो.

विशेषतः मुलींसाठी नवरात्र हा आत्मविश्वास जागवणारा संदेश देणारा उत्सव ठरला जातो.

नऊ दिवसांपैकी एक दिवस भोंडला घेतला जातो. फळ्यावर हत्तीचे चित्र काढले जाते किंवा टेबलवर हत्तीची प्रतिमा ठेवली जाते. तिचे पूजन केले जाते आणि त्या भोवती भोंडल्यांची गाणी म्हणत फेर धरला जातो. सर्वात शेवटी खिरापत काय हे ओळखले जाते व तिथे मुलांना खाऊ वाटला जातो आणि




मुलं आणि शिक्षक सर्वच त्याचा आनंद घेतात त्यातून अनेक भावना समजून सांगितल्या जातात. हत्ती हा भारतीय संस्कृतीत शक्ती, स्थैर्य, समृद्धी, बुद्धिमत्ता आणि ऐश्वर्याचे प्रतीक मानला जातो. गणपतीलाही हत्तीचे मस्तक जोडलेले असल्याने त्याला शुभत्वाचे महत्त्व आहे.

विशेषतः देवीच्या आराधनेत हत्ती हे समृद्धी आणि राजवैभवाचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. काही देवींच्या रूपांमध्ये किंवा मंदिर परंपरांमध्ये हत्तीला विशेष स्थान आहे.म्हणून हत्तीच्या प्रतिमेचे पूजन शाळा शाळेत केले जाते. आणि संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले जाते.

आजची मुलगी केवळ घराची शोभा नाही; ती शिक्षणात, विज्ञानात, क्रीडाक्षेत्रात, प्रशासनात, कला-साहित्यात आणि समाजसेवेत स्वतःची ओळख निर्माण करणारी कर्तृत्ववान लेक झाली आहे.

शाळेतील नवरात्रोत्सवात मुलींना विविध उपक्रमांत सहभागी करून घेता येईल. देवीच्या रूपांवर भाषणे, कविता, चारोळ्या, चित्रकला, निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, लेझीम, दांडिया, पारंपरिक वेशभूषा तसेच 'मुलगी



लेखिका -
वसुधा वैभव नाईक,
पुणे. मो. 9823582116

शिकली, प्रगती झाली', 'स्त्रीचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान' यांसारख्या विषयांवर जनजागृती करता येतात..स्पर्धा घेतल्या जातात.

अनेक सुंदर उपक्रमातून आजची मुलगी या मधून छान तयार होताना दिसते.

तसेच दांडियाच्या तालावर पावले पडताना केवळ मनोरंजन नको असते तर त्यातून एकजूट, शिस्त आणि संघभावनाही शिकवली जाते. प्रत्येक मुलीला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला शिकवले पाहिजे. 'मी करू शकते', 'मी शिकणार', 'मी स्वावलंबी होणार', 'मी अन्यायाविरुद्ध आवाज उठवणार' हा आत्मविश्वास तिच्या मनात निर्माण करायला हवा तरच तो खरा नवरात्रोत्सव होतो.

आज आपण पाहत आहोत मुलींना या जगात जगणेही कठीण झाले आहे.अनेक अशी उदाहरणं आहेत की मुलींना फुस लावली जात आहे.मुलींना पकडून नेलं जात आहे. काही मुली अविचाराने स्वतः घराबाहेर पडतात. काही मुली लहान वयातच प्रेम प्रकरण मध्ये पडतात आणि मग स्वतःचे नुकसान करून घेतात. या सर्वाला आळा घालण्यासाठी प्रत्येकाच्या घरातून मुलीला छान शिकवण दिली पाहिजे. तसेच समाजात वावरताना आबाल वृद्धांकडून त्यांना चांगली शिकवण दिली पाहिजे. शाळेमध्ये असे छोटे छोटे उपक्रमातून मोठ्या मोठ्या गोष्टी समजून सांगितल्या पाहिजेत. आणि हो संस्कार करणे आपल्या हातात आहे.. पण निभावणे मुलींच्या हातात आहे त्यासाठी मुलींना काळजीपूर्वक सर्व गोष्टी ऐकाव्यात आणि त्या कृतीत आणाव्यात म्हणजे अन्यायाला आपण बळी पडणार नाही.

नवरात्र आपल्याला आणखी एक महत्त्वाचा संदेश देतो तो असा वाईटावर चांगल्याचा विजय. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील आळस, भीती, खोटेपणा, मत्सर, राग आणि नकारात्मक विचारांवर मात करण्याचा संकल्प करावा. समाजात ताठ मानेने वापरावे. अन्यायाला बळी पडू नये. अत्याचाराला वाचा फोडावी. कोणतीही गोष्ट सहन करण्यापेक्षा त्याला वाचा फोडणे केव्हाही चांगले असते. मग तुम्ही घरातल्या आई-वडिलांना सांगा. तुमच्या शिक्षकांना सांगा पण कुठेतरी आपले मन मोकळे करा. तरच या स्त्रीशक्तीचा जागर खूप छान होणार आहे.

बाहेर देवीची पूजा करण्याबरोबरच आपल्या मनातील चांगुलपणाची ज्योतही तेवत ठेवावी. माणुसकी जपावी. चांगल्याच विचारांना गती द्यावी.

शाळेत नवरात्र साजरे करताना मुलगा आणि मुलगी असा भेद न करता समानता आणि परस्पर सन्मान यांचे संस्कार देणेही महत्त्वाचे आहे. मुलांनी मुलींचा सन्मान करावा आणि मुलींनीही स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव ठेवावी. कारण सक्षम मुली आणि संवेदनशील मुले मिळूनच सक्षम समाज घडवतात. यासाठी समानतेचे विविध उपक्रम शाळा पातळीवर घेतले जातात.

आजच्या धावपळीच्या जीवनात सणांचे बाह्य स्वरूप आपण जपतो; पण त्यामागचा विचार विसरतो. शाळा मात्र या सणांना संस्कारांची दिशा देते.

नवरात्रातील नऊ दिवस संपतील, दांडियाचे ताल थांबतील, सजावट उतरवली जाईल; पण विद्यार्थ्यांच्या मनात जर धैर्य, आत्मविश्वास, माणुसकी, समानता आणि चांगुलपणाची ज्योत पेटली, तर तो नवरात्रोत्सव खऱ्या अर्थाने यशस्वी झाला असे म्हणता येईल.

नवरात्राची अखंड ज्योत सांगते भेदभाव सारे मिटवा
मुलगी असो वा मुलगा त्यांना
समान संधी दयावी प्रेम, सेवा,
बंधुभावाने समाजाचा दीप पेटता ठेवा.
देवीच्या शक्तीचा अर्थ स्वतःच्या
आचरणातून दाखवा....

शालेय जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींचे घवघवीत यश!

दीपल खडेलवाल हिचा प्रथम क्रमांक; लावण्य कोल्हे व सिया राका यांचीही उत्कृष्ट कामगिरी

ज्योतिर्मय 📖 साहित्य

जळगाव (गोकुळसिंग राजपुत)- शालेय जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



या स्पर्धेत दीपल खडेलवाल हिने प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच लावण्य कोल्हे हिने चतुर्थ क्रमांक, तर सिया राका हिने पाचवा क्रमांक मिळवत आपल्या कौशल्याची चमक दाखवली. विद्यार्थिनींच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी भर पडली आहे.

या यशस्वी खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी सराव व मेहनतीच्या जोरावर स्पर्धेत यश मिळवले.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल एम. जे. स्वायत्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. केतन नारखेडे, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. आर. बी. ठाकरे, प्रा. स्वाती बऱ्हाटे, उपप्राचार्या प्रा. राजश्री महाजन, पर्यवेक्षिका प्रा. शिल्पा सरोदे, कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. उमेश पाटील, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. गुणवंत वंजारी तसेच जिमखाना समितीच्या अध्यक्षा प्रा. वर्षा पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

यावेळी महाविद्यालयातील मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या मेहनतीचे व जिद्दीचे कौतुक करत त्यांना पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाचनप्रेरणा दिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषदेत महानोरांच्या कवितांचे अभिवाचन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजीनगर - महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या निर्णयानुसार मराठवाडा साहित्य परिषद, भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचनप्रेरणादिन' म्हणून साजरा करीत असते. या वर्षीच्या वाचनप्रेरणादिनानिमित्त कविवर्य ना. धों. महानोर यांच्या कवितांचे अभिवाचन करण्यात येणार आहे. हे अभिवाचन विद्यापीठातील नाट्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार असून अभिवाचनात प्रा. गणेश शिंदे, श्रीमती उल्का पौळ, श्री. शुभम कोल्हे, श्री.अरुण गवळी, विजय मस्के, संबोधी माने, संकेत झिने आणि श्री. रमेश शिंदे हे सहभागी होणार आहेत. हा अभिवाचनाचा कार्यक्रम गुरुवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता मराठवाडा साहित्य परिषदेच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात होईल. ना. धों. महानोरांच्या कविता - अभिवाचनाच्या या उपक्रमास रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

रामदास नेहूलकर : लेखक-वाचक संवादातून वाचनसंस्कृतीला बळ

पुणे बुक फेअरमधील 'लेखक आपल्या भेटीला' उपक्रमाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ज्योतिर्मय 📖 साहित्य

पुणे - लेखक आणि वाचक यांच्यात प्रत्यक्ष संवाद घडवून आणणारा 'लेखक आपल्या भेटीला' हा उपक्रम पुणे बुक फ ` अरमध्ये उत्साहात पार पडला. लेखकांचा लेखनप्रवास, प्रेरणा, अनुभव आणि सामाजिक जाणिवा जाणून घेण्याची संधी या कार्यक्रमातून वाचकांना मिळाली. साहित्यप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम विशेष ठरला.

शुक्रवारी सकाळी झालेल्या कार्यक्रमाला दैनिक केसरीचे मुख्य उपसंपादक रामदास नेहूलकर आणि दैनिक सकाळचे मुख्य उपसंपादक आशिष तागडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. साहित्य आणि प्रसारमाध्यमे यांचा संबंध, वाचनसंस्कृतीचा विस्तार आणि लेखक-वाचक संवादाचे महत्त्व यावर या वेळी चर्चा झाली.

ॲडव्होकेट सीमंतिनी नुलकर, सविता नायक-मोहिते, डॉ. प्रेरणा उबाळे, श्रीराम नानल, प्रसाद नातू, नीलिमा गुंडी, सुवर्णा जाधव, श्री पठाण सर आणि डॉ. प्रशांत पटवर्धन यांनी सहभाग घेतला. प्रत्येक लेखकाने आपल्या अनुभवविश्वानुसार लेखनाची सुरुवात, विषयांची निवड, आलेल्या अडचणी आणि सामाजिक निरीक्षणे मांडली.

लेखकाला प्रत्यक्ष भेटल्याने पुस्तकातील विचारांचा संदर्भ अधिक स्पष्ट होतो. लेखकाने एखादा विषय का निवडला, त्यामागील अनुभव कोणता आणि लेखनप्रक्रिया कशी घडते, याची



माहिती वाचकांना मिळते. त्याचबरोबर वाचकांच्या प्रश्नांमुळे लेखकांनाही नवे विषय, वेगळे दृष्टिकोन आणि आत्मपरीक्षणाची संधी मिळते. त्यामुळे लेखन अधिक व्यापक आणि समाजाभिमुख होण्यास मदत होते, असा सूर चर्चेत उमटला.

आजच्या डिजिटल युगात माहितीची साधने वाढली असली तरी पुस्तकाचे सखोल वाचन, चिंतन आणि त्यातून विकसित होणारी विचारशक्ती यांचे महत्त्व कायम आहे. वाचनामुळे ज्ञानवृद्धीबरोबरच संवेदनशीलता आणि चिकित्सक दृष्टी विकसित होते. त्यामुळे वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्याबरोबरच लेखकांशी संवाद आणि साहित्यचर्चेसाठी व्यासपीठे निर्माण करणे आवश्यक आहे.

मुख्य अतिथी रामदास नेहुलकर यांनी आपल्या मनोगतात आपल्या बालपणीच्या वाचन सवयी बद्दल माहिती दिली. तसेच पुणे पुस्तक जत्रेच्या या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केला.

पुणे बुक फेअरमध्ये विद्यार्थ्यांचीही मोठी वर्दळ होती. विविध विषयांतील पुस्तके पाहताना आणि पाने चाळताना त्यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह दिसून येत होता. पुस्तक प्रदर्शन हे केवळ खरेदी-विक्रीचे ठिकाण नसून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबाहेरील ज्ञानविश्वाशी जोडणारे माध्यम आहे. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीत वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होते. कार्यक्रमाच्या आयोजनात राजन आणि शिरीष चिटणीस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. निमंत्रित लेखकांचे स्वागत, कार्यक्रमाचे नियोजन आणि संवादासाठी आत्मीय वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमानंतर लेखकांनी सूर्यदत्त इन्स्टिट्यूटच्या स्टॉलला सदिच्छा भेट दिली. समारोपप्रसंगी शिरीष चिटणीस यांनी आभार मानले.

'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमाने लेखक, वाचक आणि साहित्यप्रेमींना एका व्यासपीठावर आणत वाचनसंस्कृतीच्या संवर्धनाची गरज अधोरेखित केली.

विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

भाग्यावर नाही, प्रयत्नांवर विश्वास ठेवा!

पुढे.....
दररोज थोडं शिका.
चुकलात तर कारण शोधा.
अपयश आलं तर पद्धत बदला.
मदतीची गरज असेल तर मदत मागा.
आणि दुसऱ्याच्या यशाशी तुलना करण्याऐवजी कालच्या स्वतःपेक्षा आज चांगलं होण्याचा प्रयत्न करा.
कारण प्रयत्न करणारा माणूस प्रत्येक वेळी जिंकतोच असं नाही; पण प्रत्येक प्रयत्नातून काहीतरी शिकू शकतो. कधी त्याला यश मिळतं, कधी अनुभव, तर कधी नव्याने उभं राहण्याची ताकद.
सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, आपल्या प्रयत्नांची किंमत केवळ अंतिम निकालावर ठरवू नका. प्रामाणिक प्रयत्न करूनही अपेक्षित यश मिळालं नाही, तर स्वतःला अपयशी समजू नका.
दिशा तपासा, विश्रांती घ्या, नव्याने नियोजन करा आणि पुन्हा सुरुवात करा.
नशिबाने तुमच्या वाटयाला काटे दिले असतील, तर प्रयत्नांनी त्यातून वाट तयार करा.
आयुष्याच्या शेवटी मनाला ही खंत राहू देऊ नका—
"मी प्रयत्न केले असते, तर कदाचित माझं आयुष्य वेगळं असतं..."
त्याऐवजी समाधानाने म्हणता आलं पाहिजे —
"परिस्थिती माझ्या बाजूने नव्हती, नशीब नेहमी साथ देत नव्हतं; पण मी स्वतःची साथ कधीच सोडली नाही!"
कारण शेवटी विजय हा केवळ नशिबाने मिळालेल्या संधीचा नसतो...
तो त्या माणसाचा असतो, ज्याच्या डोळ्यांत अश्रू असतानाही स्वप्नं जिवंत असतात, ज्याच्या पायांना थकवा आलेला असतानाही चालण्याची जिद्द असते आणि ज्याच्या मनात हजार शंका असतानाही एक आवाज ठामपणे म्हणत असतो—
"अजून संपलेलं नाही... मी पुन्हा प्रयत्न करणार!"
प्रयत्नांची पराकाष्ठा करा, कर्मावर श्रद्धा ठेवा आणि स्वतःच्या अफाट क्षमतेवर विश्वास ठेवा. कारण नशिबाच्या दारात रडत बसण्यापेक्षा प्रयत्नांची तलवार घेऊन मार्ग काढणे हाच माणसाचा सर्वात मोठा धर्म आहे. ज्या दिवशी तुम्ही कर्माला आपले सर्वस्व मान जाल, त्याच दिवशी तुमच्या 'विचार ते विजय' या महाप्रवासाची सुवर्ण पहाट उगवल्याशिवाय राहणार नाही!

कुटुंबप्रमुख हवा आहे ! भाग ८ : मनाचे श्लोक

दुसऱ्या दिवशी श्रीराम शाळेतून दुपारी चार वाजता घरी पोहोचला. शाळेची दप्तरातील पुस्तके व वह्या योग्य जागी ठेवल्यावर तो लगेच मामा आजोबांकडे गेला.


'आजोबा, काल तुम्ही मनाच्या नियंत्रणाच्या विज्ञानाबद्दल सांगणार होतात. ते संस्कारांनी साधता येते, असेही म्हणाला होतात. त्यासाठी पातंजल योगसूत्रातील ''योगश्चित्तवृत्तिनिरोधः'' हे सूत्र सांगितले होते. मी रात्रभर विचार केला; पण मनावर संस्कार कसे करायचे, हे मला समजले नाही.'

'श्रीराम, तू त्यावर विचार करून उत्तर शोधण्याचा प्रयत्न केलास, याचा मला आनंद वाटतो. या सूत्राचा अर्थ चित्ताच्या हालचाली, मानसिक व्यापार आणि विचारतरंग यांचे संयमन करणे, असा आहे.'

'आजोबा, पण चित्त म्हणजे काय?' श्रीरामने विचारले.

'योग्य प्रश्न! चित्त म्हणजे केवळ मन नव्हे; विचार, भावना आणि मानसिक अनुभव यांचाही त्यात समावेश होतो. चित्तवृत्तिनिरोध म्हणजे या मानसिक हालचालींवर संयम मिळवणे. याचा अर्थ विचार दाबून टाकणे नव्हे.'

'मग योग म्हणजे एरोबिक्ससारखा व्यायाम का? आंतरराष्ट्रीय योगदिनाला सगळे विशिष्ट व्यायाम करतात, तोच योग का?' श्रीरामने विचारले. त्याचा प्रश्न ऐकून कृष्णकांत आणि पामेला यांना आनंद झाला.



'श्रीराम, तुला फ ` विकोल माहीत आहे?' आजोबांनी विचारले.

'मी सांगते!' श्रुतकीर्ती म्हणाली. 'फेविकोल म्हणजे दोन वस्तूंना जोडणारा पदार्थ!'

'वा! किती हुशार आहेस!' आजोबांनी तिला टाळी दिली.

'पण आजोबा, फेविकोल आणि योगाचा काय संबंध?' श्रीरामने विचारले.

'फेविकोल दोन वस्तू जोडते. त्याप्रमाणे योग शरीर आणि मन यांच्यातील समन्वय साधण्यास मदत करतो.'

'मग योग म्हणजे वायर किंवा रसायन आहे का?'

'नाही. योग ही शरीर, मन आणि विचार यांच्यात समन्वय साधण्याची साधना आहे.'

'मग ती अवस्था कशी मिळवायची?' श्रीरामने विचारले.

'तेच योगशास्त्राचे गुपित आहे. त्याबद्दल आपण पुढे बोलू. आधी मनाच्या श्लोकांची ओळख करून घेऊ.'

'मनाचे श्लोक म्हणजे मनाला वाटेल तसे लिहिलेले श्लोक का?' श्रुतकीर्तीने विचारले.

'नाही. समर्थ रामदासस्वामींनी रचलेले हे श्लोक मनाला योग्य दिशा देणारे विचार सांगतात. त्यांचा अर्थ समजून घेऊन आचरणात आणण्याचा प्रयत्न करायचा.'

'इट मीन्स अ स्टेप-बाय-स्टेप प्रोसेस टू गाईड अवर माइंड' श्रीराम म्हणाला.

'छान! आपण पुढच्या वेळी याबद्दल सविस्तर बोलू,' आजोबा म्हणाले.

'अरे मुलांनो, आजोबांना जरा विश्रांती घेऊ द्या,' पामेला म्हणाली.

'आजोबा, उद्या नक्की मनाचे श्लोक!' श्रीराम म्हणाला.

'अगदी नक्की!' आजोबा उत्तरले.

क्रमशः भाग ९ : मनाचे श्लोक

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

स्त्री शक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का?

ज्योतिर्मय साहित्य

नवरात्री आणि आपली आजची मानसिकता या विषयाकडे पाहताना असे लक्षात येते की, काळानुसार मानवी स्वभाव, जीवनशैली आणि श्रध्दा ठेवण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. आजच्या आधुनिक जगात नवरात्रीच्या नऊ दिवसांकडे आणि मानसिकतेकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन समोर येतात. नवरात्री आणि आजची मानसिकता या दोन्ही गोष्टींचा परस्परसंबंध अत्यंत रंजक आणि विचार करायला लावणारा आहे. नवरात्र हा केवळ नऊ दिवस उपवास करण्याचा, गरबा खेळण्याचा किंवा धार्मिक विधींचा सण राहिलेला नाही, तर तो आजच्या मानवी मानसिकतेचे आणि बदलत्या सामाजिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब बनला आहे.

पूर्वी नवरात्र हा प्रामुख्याने कडक उपवास, व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा आणि अध्यात्माचा काळ मानला जायचा. आजच्या मानसिकतेत श्रध्दा कायम आहे, पण तिचे स्वरूप अधिक उत्सवप्रिय आणि सामाजिक झाले असून भक्तीपेक्षा दिखाव्याला अधिक महत्त्व आले आहे. गरबा, दांडिया, नऊ रंगाचे कपडे घालणे आणि सोशल मीडियावर फोटो शेअर करणे याभोवती तरुणाई अधिक फिरताना दिसते. भक्तीची जागा ब-याच अंशी मनोरंजनाचे आणि ताणतणाव विसरण्याच्या साधनाने घेतली आहे. गरबा आणि दांडिया हे आता मोठे व्यावसायिक इव्हेंट्स झाले आहेत. महागडे पासेस, डिझायनर कपडे यावर होणारा खर्च आजच्या दिसण्याच्या मानसिकतेवर प्रकाश टाकतो. आजच्या मानसिकतेची एक नकारात्मक बाजू म्हणजे या सणाचे झालेले प्रचंड व्यापारीकरण. नऊ दिवसांचे पासेस, महागडे कपडे, इव्हेंट्स आणि स्पॉन्सर्स यांच्या गर्दीत सणाचा मूळ गाभा आणि साधेपणा काहीसा हरवत चालला आहे. गरब्यासाठी महागडे पासेस, डिझायनर कपडे यामुळे या सणाचे स्वरूप थोडे व्यावसायिक झाले आहे. यामुळे कधीकधी मूळ आध्यात्मिक भाव मागे पडतो की काय, अशी शंका येते. अनेकांसाठी हा सण आध्यात्मिक अनुभूतीपेक्षा स्टेटस सिम्बॉल किंवा दिखाव्याचे माध्यम बनत चालला आहे.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावाचे झाले आहे. अशा वेळी नवरात्रीचे नऊ दिवस अनेक लोकांसाठी मानसिक शांतता आणि डिटॉक्स करण्याचा काळ बनला आहेत. पूर्वी उपवास हा केवळ धार्मिक भाग होता, आज लोक याकडे आरोग्य आणि शरीराला विश्रांती देण्याच्या मानसिकतेतूनही पाहतात. दैनंदिन तणावातून काही काळ बाजूला होऊन मन सकारात्मक ऊर्जेने भरण्यासाठी लोक या दिवसांत देवीची उपासना करतात. नऊ दिवस केली जाणारी प्रार्थना किंवा ध्यान लोकांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे साधन वाटते. आजच्या डिजिटल युगात माणूस स्क्रीनला खिळलेला असतो. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना घराबाहेर पडून, मित्रांना भेटण्याची आणि गरब्याच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी देतात. त्यामुळे गरबा आणि दांडिया हे केवळ नृत्य राहिले नसून, ते आजच्या पिढीसाठी ताणतणाव विसरून मुक्तपणे जगण्याचे आणि आनंद साजरा करण्याचे माध्यम बनले आहे. तसेच हा सण आता केवळ घरात पूजेपुरता मर्यादित न राहता, एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा एक मोठा सामाजिक सोहळा बनला आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंवर विजय मिळवणे हा या सणाचा खरा उद्देश आहे.

नवरात्र म्हणजे आदिशक्तीच्या, स्त्री शक्तीच्या जागरणाचा उत्सव. आजचा सुशिक्षित समाज या नऊ दिवसांत स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल उघडपणे बोलू लागला आहे. स्त्रीला केवळ अबला न मानता तिचे दुर्गा रूप स्वीकारण्यास तयार होत आहे म्हणजेच आजची मानसिकता या संकल्पनेला अधिक प्रगल्भतेने पाहू लागली आहे. एकीकडे समाजात कर्तृत्ववान स्त्रियांचा आदर करणे, त्यांना समान संधी देणे याविषयीची जाणीव वाढली आहे म्हणजेच सकारात्मक बदल दिसून येत आहे. तर दुसरीकडे द्वंद्व ही पहायला मिळत आहे. नऊ दिवस देवीची मनोभावे पूजा करतो. पण समाजात ख-या आयुष्यातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा त्यांच्याशी होणारा दुजाभाव



थांबवायचा नाही म्हणजेच दुर्लक्ष करायचे. नवरात्रीत आपण दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा करतो. लहान मुलींना देवी मानून त्यांचे पादपूजन करून पाय पडतो. पण दुसरीकडे, समाजात महिलांविरुध्दचे गुन्हे आणि मानसिक छळ कमी झालेला नाही. नऊ दिवस ज्या स्त्री शक्तीला आपण पूजतो, त्याच स्त्रीचा रोजच्या आयुष्यात किती आदर केला जातो म्हणजे महिलांची सुरक्षितता आणि आदर हा आजच्या मानसिकतेसमोरील मोठा प्रश्न आहे. आधुनिक महिला आता या सणाकडे स्वत:मधील दुर्गा (आत्मविश्वास आणि शक्ती) जागृत करण्याचे माध्यम म्हणून पाहत आहे. आजची स्त्री अन्यायाविरुध्द आवाज उठवण्यासाठी नवरात्रीच्या ऊर्जेचा वापर करत आहे.

आजच्या न्यूक्लियर फॅमिली आणि डिजिटल जगात माणूस एकटा पडत चालला आहे. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना एकत्र आणतात, ज्यामुळे एकटेपणाची मानसिकता दूर होऊन समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि मानसिक प्रवासाला एक नवी ऊर्जा मिळते. सर्व मतभेद, जात-पात बाजूला ठेवून एकत्र नाचणे, आनंद साजरा करणे यामुळे समाजातील एकतेची भावना बळकट होते. वर्षभराच्या थकव्यानंतर मानवी मनाला पुन्हा नवसंजीवनी देणारा हा काळ ठरतो. नवरात्रीच्या नऊ रंगाचे आजच्या काळात वेगळेच वेड आहे. कार्यालयांमध्ये, कॉलेजमध्ये सर्वजण एकाच रंगाचे कपडे घालताना दिसून येते. ही मानसिकता एकता आणि समानता दर्शवते. विषमतेच्या भिंती तोडून सर्वांनी एकत्र येण्याची ही आधुनिक मानसिकता नक्कीच कौतुकास्पद आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे आजची मानसिकता नवरात्रीकडे एक पारंपरिक धार्मिक सण म्हणून तर पाहतेच, पण सोबतीला मनोरंजन, सामाजिक एकत्रिकरण आणि मानसिक ऊर्जा मिळवण्याचे एक उत्तम माध्यम म्हणूनही याकडे बघते. नवरात्री हा केवळ एक धार्मिक सण राहिलेला नाही, तर तो सामाजिक एकत्रिकरण, आत्मपरीक्षण आणि मनोरंजनाचा एक मोठा उत्सव बनला आहे. गरज आहे ती फक्त बाह्य भपक्यापलीकडे जाऊन या सणामागील स्त्री शक्तीचा आदर आणि अंतर्मनाच्या शुद्धीकरणाचा विचार जपण्याची आणि देवीच्या रूपांमधील संयम, बुध्दी आणि करुणा हे गुण आपल्या दैनंदिन विचारांमध्ये आणि वर्तनात उतरवण्याची. जेणेकरून ख-या अर्थाने आपल्या मनातील महिषासूर रुपी नकारात्मक विचारांचा मर्दन करता येईल.

आधुनिक काळात लोकांच्या मानसिकतेत एक सकारात्मक बदलही पाहायला मिळत आहे, तो म्हणजे पर्यावरणपूरक नवरात्र. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तीची स्थापना करणे, रासायनिक रंगाऐवजी नैसर्गिक रंगाचा वापर करणे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आवाजाची मर्यादा पाळणे याविषयी आजची तरुण पिढी जागरूक होत आहे. हा बदल समाजाच्या प्रगतीशील मानसिकतेचे लक्षण आहे. अनेक मंडळांमध्ये आता महागड्या मूर्ती किंवा सजावटीऐवजी त्या पैशातून रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना मदत किंवा वृक्षारोपण यासारखे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. म्हणजेच आजची तरुण पिढी अधिक संवेदनशील होताना दिसते. लोक परंपरेचा आदर करत आहेत, पण त्यात स्वत:च्या सोयीनुसार आणि आधुनिक विचारसरणीनुसार बदलही करत आहेत.

भारतीय संस्कृतीत नारीला आदिशक्तीचे रूप मानले गेले आहे. त्यामुळे नवरात्र हा भारतीय संस्कृतील अत्यंत महत्त्वाचा, ऊर्जेचा आणि आदिशक्तीच्या उपासनेचा सण आहे. नऊ दिवस चालणा-या या उत्सवात आपण दुर्गेच्या नऊ रूपांची अत्यंत भक्तीभावाने पूजा करतो, उपवास करतो आणि तिचा जयजयकार करतो. हा सण केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो वाईटावर चांगल्याचा विजय आणि स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचे प्रतिक आहे. पण नवरात्र संपताच, या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता म्हणणारे आपण, आपल्याच घरातील आणि समाजातील जिवंत स्त्रीशक्तीचा आदर करायला का विसरतो? आपण पुन्हा आपल्या जुन्या मानसिकतेकडे का वळतो? म्हणून स्त्रीशक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का? हा आजच्या काळातील आधुनिक समाजासमोरील एक अत्यंत गंभीर आणि विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

एकीकडे आपण स्त्रीला देवीचे रूप मानून तिच्यासमोर नतमस्तक होतो, तर दुसरीकडे प्रत्यक्ष आयुष्यात अनेक स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. वर्षातील नऊ दिवस तिची पूजा करणे आणि उर्वरित ३५६ दिवस तिच्या अस्तित्वाचा, तिच्या हक्कांचा आणि तिच्या भावनांचा आदर न करणे, हा एक ढोंगीपणा आहे. ख-या स्त्रीशक्तीचा आदर करायचा असेल,

सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ

तर तो केवळ काही दिवसांपुरता मर्यादित न राहता दैनंदिन जीवनाचा भाग असायला हवा. आजच्या आधुनिक युगातही आपल्याला अनेक विरोधाभास पाहायला मिळतात. नवरात्रीत रात्री उशिरापर्यंत गरबा खेळणा-या मुलींना सुरक्षित वातावरण मिळते, पण एरवी मात्र त्यांना रात्री बाहेर पडताना हजार वेळा विचार करावा लागतो. एका बाजूला कन्या पूजन केले जाते, तर दुस-या बाजूला आजही समाजात मुलगा आणि मुलगी असा भेद केला जातो. घरात आणि कामाच्या ठिकाणी रात्रंदिवस झटणा-या स्त्रीच्या कष्टाला अनेकदा गृहीत धरले जाते.

स्त्रीशक्तीचा खरा आदर केवळ मूर्तीची पूजा करण्यात किंवा तिची स्तुती गाण्यात नाही. शिक्षण, नोकरी आणि प्रगतीचे निर्णय घेताना तिला पुरुषांच्या बरोबरीने समान संधी आणि स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रीला घरात, रस्त्यावर आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानाचे नि रात्रीच्या वेळीही भीतीमुक्त वातावरण मिळायला हवे. तिच्या मताला, तिच्या आवडीनिवडीला महत्त्व आणि तिच्या स्वप्नांवर बंधने न घालता तिला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे स्वातंत्र्य समाजात दिले पाहिजे. मुलांवर लहानपणापासूनच मुलींचा आदर करण्याचे संस्कार झाले पाहिजे. जोपर्यंत आपण घरातल्या स्त्रीला माणूस म्हणून आदर देत नाही, तोपर्यंत मंदिरातील देवीची पूजा व्यर्थ आहे. स्त्री ही केवळ चूल आणि मूल सांभाळणारी व्यक्ती नसून ती आज अंतराळापासून ते देशाच्या संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत आहे. तिच्यातील या अथांग शक्तीचा आदर रोजच्या व्यवहारात दिसणे गरजेचे आहे.

काळ बदलतो तशा सण साजरा करण्याच्या पद्धती बदलतात हे स्वाभाविक आहे. आजच्या मानसिकतेत जरी आधुनिकता आणि मनोरंजन वाढले असले, तरी सणाचे मूळ मर्म विसरता कामा नये. नवरात्र ही केवळ नऊ दिवस नटण्याची किंवा गरबा खेळण्याची संधी नाही, तर ती स्वत:मधील नकारात्मक विचार, अहंकार आणि वाईट सवयींवर विजय मिळवण्याची पर्वणी आहे. स्त्री ही केवळ नवरात्रीत पुजली जाणारी मूर्ती नाही, तर ती सृष्टीचे चक्र चालवणारी, कुटुंबाला आधार देणारी आणि समाजाची प्रगती साधणारी जिवंत शक्ती आहे. जोपर्यंत आपण आपल्या घरातील आई, बहीण, पत्नी आणि मुलगी यांच्या कर्तृत्वाचा आणि अस्तित्वाचा आदर करत नाही, तोपर्यंत नवरात्रीच्या पूजेला काहीच अर्थ उरणार नाही. म्हणूनच, स्त्रीशक्तीचा आदर हा केवळ नऊ दिवसांचा उत्सव न ठरता, तो ३६५ दिवसांचा जीवनमार्ग बनला पाहिजे. आपण समाजातल्या प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण देऊ, तरच ख-या अर्थाने देशात आणि समाजात नवरात्र साजरी होईल.

प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेत कथाकथनचा कार्यक्रम संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेने मृदगंध परिवाराचा कथाकथन हा कार्यक्रम गीता भवन येथे गुरुवार ०८-१०-२०२६ रोजी आयोजित केला होता. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद बेंडे, सचिव कमलाकर पाठक, उपाध्यक्ष वंदना देशमुख व मृदगंध चे प्रशांत नानकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमोद बेंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मृदगंध विषयी बोलतांना ते म्हणाले प्रशांत नानकर हे ट्रान्सडेल्टा ह्या विद्युत उपकरणे बनविणाऱ्या उद्योगाचे व्यवस्थापकीय संचालक असून त्यांनी मृदगंध परिवाराची स्थापना २०१७ मध्ये केली. सामाजिक उपक्रमा सोबतच अनेक कला आणि कलाकारांच्या संवर्धनासाठी, विकासासाठी आणि प्रोत्साहना साठी मृदगंध काम करते. या अंतर्गत सुगम शास्त्रीय गायन, कथाकथन, अभिवाचन,काव्य वाचन, संगीत प्रशिक्षण, चित्र प्रदर्शन असे अनेक उपक्रम राबविण्यात येतात.

आजच्या कथाकथन कार्यक्रमात विविध मान्यवरांनी रंजक कथा सादर केल्या.

ऋषिकेश अभ्यंकर यांनी आईची ठेव ही कथा सांगितली. एक मुलीचा बाप असलेला व्यक्ति आजारी पत्नीला धोका देऊन दुसऱ्या बाईच्या प्रेमात पडतो. पत्नीला याची कल्पना असते. ती एक मृत्यूपत्र लिहून ठेवते. पत्नीचे निधन झाल्यावर दुसरे लग्न करून सावत्र आईस घरात आणतो. मृत पत्नीच्या कपाटातील मृत्यूपत्र पतीच्या हाती लागते. त्यात तिने लिहून ठेवले असते की माझ्या मृत्यू नंतर सहा महिन्याच्या आत पतीने दुसरे लग्न केल्यास त्याचा घरावर हक्क राहणार नाही. त्याला घरातून बाहेर जावे लागेल. घर मुलीला मिळेल. हे वाचून पतीला आपली चूक कळते.

हेमलता कुलकर्णी यांनी संशय कल्लोळ ही कथा सांगितली. कथेचा सारांश असा आहे. ज्या व्यक्तीवर आपले प्रेम असते त्याच्याशी एकनिष्ट न राहता संपतीच्या लोभा पायी दुसऱ्या व्यक्ति बरोबर संसार केल्यास पश्चयाताप झाल्याशिवाय रहात नाही.

मधुरा गोरे यांनी व्यंकुची शिकवणी ही विनोदी



कथा खुमासदार पणे सादर केली. एक शिक्षक जेंव्हा स्वतःचे ध्येय, कर्तव्य विसरून वाईट सवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या संगतीने कसा वाईट मार्गाला लागतो याचे वर्णन कथे मध्ये केले.

मैथिली जोशी यांनी विजय देवधर यांची वीरांची साहस कथा सांगितली. किल्यातील युद्ध प्रकारात बलून चा निरीक्षणासाठी तंत्र स्वरूपात होणारा वापर, जॉन ग्रेसी व त्याचा साथीदार बलून मध्ये बसून उंच आकाशात जाऊन निरीक्षण करीत असतांना चुकीची दोरी ओढल्याने बलून जास्त वेगाने आकाशात उंच जातो. बलून खाली आणण्यासाठी त्या दोघांचे प्रयत्न, होणारी मानसिक घालमेल, प्रत्येक स्थितीला येणारे टेन्शन, शेवटी बलून खाली येत असतांना साथीदार बलून च्या बाहेर पडणे, ग्रेसी च्या खांद्याचे हाड मोडणे त्याचा पाय दोरीत अडकून डोके खाली पाय वर या स्थितीत बलून खाली येणे, शेवटी सुखरूप जमिनीवर उतरणे व तीन महिन्या नंतर पून्हा दुसऱ्यांदा त्याचीच बलून निरीक्षण म्हणून होणारी निवड, हे अंगावर शहारे आणणारे साहसी प्रसंग सांगितले.

तर राजन सावरीकर यांनी रत्नाकर मतकरी यांची '' ति, मी आणि तो '' ही रहस्य कथा सांगून श्रोत्यांना मंत्र मुग्ध केले.

प्रशांत नानकर यांनी यमराजाची डायरी ही कथा सादर केली. मृत्यू समोर आल्यावर माणूस आपल्या राहिलेल्या इच्छा अपूर्ण असल्याची खंत करतो. यमराज त्याला डायरी देतो व ठराविक वेळेत स्वतःच्या इच्छा लिहिण्यास सांगतो. माणूस स्वतःच्या इच्छा लिहिण्या ऐवजी इतरांविषयी नकारात्मक गोष्टी लिहिण्यात वेळ घालवतो. वेळ संपल्यावर यमराज त्यास म्हणतो तुला दिलेल्या वेळेत आयुष्यभर दुसऱ्याविषयी नकारात्मक व दुष्ट विचार करण्यापेक्षा स्वतः चांगले कार्य केले असते तर आज ही वेळ आली नसती.

कथेचा सारांश असा आहे आपण जीवनात नेहमी दुसऱ्याला सतमार्गाने काम करण्यास प्रवृत्त करावे. नेहमी सत्कर्म केल्यास पुण्य प्राप्त होते. व शेवटी सर्व इच्छा पूर्ण झाल्याचे समाधान मिळते.

सूत्रसंचालन व आभार ज्योति पाटील यांनी केले. पसायदान शैला मोहनपुरकर यांनी सादर केले.

कार्यक्रमास संस्थेचे सभासद व मृदगंध परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुपारी १ ते ५ या वेळेत लायन्स आय हॉस्पिटल, एन १, सिडको द्वारा ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते. शिबिरात १०० ज्येष्ठ नागरिकांची रँडम रक्त शर्करा चाचणी व डोळ्याची तपासणी करण्यात आली. २५% ज्येष्ठ नागरिकांना मोतीबिंदू असल्याचे निदान करण्यात आले. लायन्स आय हॉस्पिटल द्वारे त्यांची सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यात येईल असे डॉ. आयुषी जैस्वाल यांनी सांगितले.

रसिकांनी अनुभवला सुश्राव्य गायनाचा अवर्णनीय आनंद

शारदीय नवरात्र संगीत महोत्सवाचे तिसरे पुष्प : मधुर स्वरांनी रंगली संगीत मैफल

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर - शारदीय नवरात्र संगीत महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी संगीत रसिकांना दर्जेदार आणि सुश्राव्य गायनाची पर्वणी मिळाली.

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात मराठी वाहिनीवरील गायन स्पर्धेचा विजेता,(वडीगोद्री,अंबड जि. जालना) येथील १३ वर्षीय बालगायक संकल्प काळे याचे गायन झाले. त्याने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत 'राग पुरिया कल्याण'अत्यंत सहज आणि प्रभावीपणे सादर केला. त्याच्या सुरेल आणि आत्मविश्वासपूर्ण गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. त्याला गुरू प्रा. गजानन केचे यांनी हार्मोनियमवर, तर कृष्णा सव्वाशे यांनी तबल्यावर समर्थ साथ केली.

दुसऱ्या सत्रात प्रथितयश आणि राष्ट्रीय स्तरावर मानाची फेलोशिप आणि अनेक पुरस्कार प्राप्त युवा गायिका युगंधरा केचे हिच्या मधुर स्वरांनी वातावरण विलक्षण संगीतमय झाले. तिने राग हमीर, राग सरस्वती यांसह ठुमरीचे प्रभावी सादरीकरण केले. याशिवाय विष्णूचा कानडी अभंग आणि नाट्यगीत यांचे हृदयस्पर्शी सादरीकरण करून तिने रसिकांची मनं जिंकली. तिच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दाद दिली. तिचे गुरु आणि वडील प्रा. गजानन केचे यांनी संवादिनीवर आणि तबल्यावर रुद्र केचे याने साथ दिली.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत अपसिंगेकर यांनी केले.

जुने हेडगेवार रुग्णालयामागे, भाग्यनगर येथे दररोज सायंकाळी ७ वाजता सुरू असलेल्या या संगीत महोत्सवाचा संगीतप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिता देशपांडे आणि डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी केले आहे.

महोत्सवाच्या आज ईश्वरी कुलकर्णी यांचे गायन, सनतकुमार बडे यांचे पखवाज वादन आणि अफजल हुसैन यांचे ध्रुपद गायन होणार आहे. संगीत रसिकांनी या सुरेल संगीत मैफलीचा आनंद घ्यावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

नारायण श्रीनिवास कोर्टीकर यांचे निधन

ज्योतिर्मय साहित्य



नारायण श्रीनिवास कोर्टीकर (८७) यांचे सोलापूर येथे निवासस्थानी आज दिनांक. १४ ऑक्टोबर. २६ रोजी पहाटे १.३० वाजता निधन झाले. त्यांचा मुलगा, मुलगी, सून, जावई. अमेरिकेतून आल्यावर उद्या दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सोलापुरात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. नारायण कोर्टीकर ह सोलापूर येथून कृषी अधिकारी म्हणून निवृत्त झालेले होते. नारायण कोर्टीकर अत्यंत शिस्तप्रिय, कर्तव्य निष्ठ, संस्कारक्षम, मनमिळाऊ, प्रेमळ स्वभावामुळे लोकप्रिय होते. त्यांच्या मागे त्यांची पत्नी, दोन मुले, दोन सूना, एक मुलगी, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. नाट्य कलावंत शंतनु कोर्टीकर यांचे ते वडील होत. छत्रपती संभाजीनगर मधील ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांचे ते वडील बंधू होत.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

पिवळा रंग : संपन्न अध्यात्मिक व्यक्तिमत्वाचे प्रतीक


ज्योतिर्मय साहित्य

सर्व शक्तीपीठ असलेल्या देवी मातेच्या नवरात्र उत्सवामध्ये पिवळ्या रंगाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, जो आनंद, सकारात्मक ऊर्जा, ज्ञान आणि चैतन्याचे प्रतीक मानला जातो. शारदीय नवरात्र उत्सवात पिवळा रंग हा पाचव्या दिवशी (स्कंदमाता) किंवा काही परंपरांनुसार दुसऱ्या किंवा पहिल्या दिवशी देवीला अर्पण केला जातो. स्कंदमाता ही आईच्या वात्सल्याचे , शुद्ध प्रेमाचे आणि करुणेचे प्रतीक मानली जाते.

अध्यात्मिक कार्यात तसेच हिंदू धर्मातील सर्व धार्मिक कार्यक्रमांमध्ये पिवळी फुले पिवळे वस्त्र यांचे मोठे महत्त्व आहे.

धार्मिक पूजाविधी मध्ये पूजेमध्ये झेंडूची, शेवंतीची पिवळी फुले, पिवळी वस्त्रे आणि हळदीचा वापर शुभ मानला जातो, जो समृद्धी आणि शुभता आणतो. भारतभर होणारे विजयादशमी किंवा दसरा पूजन हे तर संपूर्णपणे झेंडूच्या पिवळ्या फ ुलांशिवाय होतच नाही.





हा पिवळा रंग ज्ञान, अभ्यास, एकाग्रता आणि मानसिक विकासाचे प्रतीक मानला जातो. पिवळा रंग बुद्धी कुशाग्र करण्यास आणि स्मरणशक्ती सुधारण्यास मदत करतो. हा रंग सूर्याच्या प्रकाशाप्रमाणे उर्जा, उत्साह आणि मनाला प्रसन्नता देणारा असाच असतो.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनानुसार पिवळा रंग ज्यांना आवडतो त्या व्यक्ती तीक्ष्ण , तल्लख अशा असामान्य बुद्धिमत्तेच्या असून त्यांची स्मरणशक्ती सुध्दा विशेष असते. तसेच ते परिश्रम करणारे आणि प्रामाणिक असतात.

पिवळा रंग हा संपन्न व्यक्तिमत्व दर्शवतो. पिवळ्या रंगाची विशेष आवड असणाऱ्या व्यक्ती अध्यात्मात व आत्म साधने मध्ये सतत प्रभावाने पुढे जाणाऱ्या असतात.

वाचन प्रेरणा दिन

ज्योतिर्मय साहित्य

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतः ला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.



आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. **(क्रमशः)**

काकासाहेब कालेलकर – भाग २

ज्योतिर्मय साहित्य

उमाशंकर जोशी यांच्या एका लेखात काकासाहेब कालेलकर यांची मराठी मातृ भाषा असून ते एक महानतम गुजराथी लेखक आहेत असा उल्लेख आहे. काकासाहेब भारतीय संस्कृती व गांधीजींच्या विचारांचे मर्म समजून सांगण्यात अग्रगणी होते.ते भाषेच्या प्रेमात पडले होते. भाषेचा वापर ते सर्जनशीलतेने करीत.



साबरमती आश्रम शाळेचे काही काळ ते प्रमुख होते. त्यांनी हिमालयात २५०० मैल पायपीट केली. त्यामुळे त्यांच्याकडे अनुभवांचा साठा होता. तेथे त्यांना गुजराथीचा उपयोग झाला. विद्यार्थ्यांना प्रवास कहाण्या आवडत असत. त्यात त्यांच्या गोष्टी मिसळलेल्या असत. त्यातून त्यांची १. हिमालय नो प्रवास २.स्मरण यात्रा, ही दोन पुस्तके तयार झाली.

१९२५ च्या सुमारास ते वर्धा येथे गेले. तेथे त्यांनी १.सब की बोली २. सर्वोदय ३.मंगल प्रभात या नियतकालिकांचे संपादन केले. काकासाहेबांचे लिखाण सामावणारे १५खंड (प्रत्येकी ६०० पाने)भरतील इतके आहे. त्यावरुन आताही त्याचे महत्व अधोरेखित होते.

त्यांच्या लिखाणात शिक्षण, समाज, संस्कृती, धर्म, साहित्य हे विषय आलेले आहेत. याशिवाय निबंध , प्रवास वर्णने, चरित्रात्मक, आत्म चरित्रात्मक लिखाणाचा समावेश आहे. ते भारतीय साहित्याचे महत्वाचे निर्माते होते. त्यांच्या निबंधाच्या साध्या भाषेचा मोह वाचकांना खिळवून टाकत असे. ते सवाई गुजराथी म्हणून प्रसिद्ध होते.

निसर्गाचे सौंदर्य ते खूप चांगले खुलवत. कवी कालीदासा नंतर कालेलकरा सारखे फार थोडे असे लेखक आहेत, ज्यांनी पुढिल पिढ्यासाठी येथील निसर्गाचे निकटतेने इतके सुंदर व सूक्ष्मतेने अविस्मरणीय भाषेत वर्णन केले आहे. त्यांचे नद्यावरील लेख संग्रह लोकमाता उल्लेखनीय आहे. त्यांच्या शब्दात ताऱ्यांचे संगीत व जादू आहे. त्यांच्या लिखाणात हास्य ही भरपूर आहे.

त्यांच्यात खोडसाळपणा होता. ते विनोद घडऊन आणत. त्यांना संदर्भ त्वरीत आठवत. एकदा जेल मध्ये त्यांच्या झोपण्याच्या जागी त्यांना एक बेडूक दिसला. तेव्हा त्यांना उत्तररामचरित्रातील सीतेच्या हाताच्या स्पर्शाचे वर्णन आठवले. (एक प्रेमळ, शांत शीतल स्पर्श). त्यांच्या जेलच्या सळया बाहेर एक गुरगुरत असलेले मांजर बघितल्यावर त्यांना पिंजऱ्यात आपण व प्राणी बाहेर हा विरोधाभास लक्षात आला. त्यांना फुलपाखरे, पक्षी, खारी, बेडूक,कीटक, झाडे, फुले, ढग, तारे आनंद देत.



बघा! अंड्याच्या आकाराचा ढग येत आहे.त्याचा तळ बाष्प अधिक असल्याने काळा आहे. ढगाचा वरचा भाग पांढरट आहे कारण तिथे आद्रता कमी आहे. असे वर्णन करतात. त्यांना एकदा ढग आबा साहेबांच्या दाढी सारखा वाटला आहे. त्यांनी अनेक प्रतिशब्द दिले आहेत. अनेक संस्थाच्या योग्य नामकरणात सहाय्य केले आहे. चॅन्सलर साठी कुलपती, व्हाईस चॅन्सलर साठी कुलनायक, ॲटोमिक रिॲक्टर साठी अप्सरा ही नावे त्यांनी दिलेली आहेत.

त्यांच्या काही पुस्तकांच्या नावात जीवन शब्द आहे. उदा. १.जीवन नो आनंद २.जीवन विकास ३.जीवन भारती ४ जीवन संस्कृती, ५.जीवन लीला इ. त्यांनी समन्वयाचा संदेश दिला आहे. भारतीयात वंश, धर्म, भाषा, वर्तन प्रकार यात सुसंवाद झाल्यास जागतिक स्तरावर संश्लेषण होऊ शकते असे त्यांचे मत होते. त्यांच्यावर गांधीजी व रविंद्रनाथ या दोघांचा प्रभाव राहिला आहे.

(संदर्भ: भारतीय साहित्य नियतकालिक. जाने* फेब्रू १९८६ अंक)

ज्ञान संदीप शिक्षण संस्थेत ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे, सचिव खिल्लारे मॅडम तसेच मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे, विद्यार्थी व शिक्षकांनी त्रिसरण व पंचशीलासह बौद्ध वंदना ग्रहण केली. शांत व मंगलमय वातावरणात झालेल्या या वंदनेने कार्यक्रमाला विशेष गांभीर्य प्राप्त झाले. यानंतर विद्यार्थ्यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. इयत्ता पहिलीच्या चिमुकल्यांनी उत्कृष्ट नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रत्नमाला घोरपडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत सादर केले. त्यांच्या सुरेल गायनाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाशराव सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. हा दिवस केवळ धर्मांतराचा नव्हे, तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देणारा, समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित नवा मार्ग दाखवणारा ऐतिहासिक दिवस आहे. डॉ.बाबासाहेबांनी दिलेला ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'' हा संदेश आजच्या पिढीने आचरणात आणावा, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षण हे प्रगतीचे सर्वात मोठे साधन असून नियमित अभ्यास, शिस्त, चांगले चारित्र्य आणि सामाजिक जाणीव या गुणांच्या जोरावरच विद्यार्थी स्वतःचे व समाजाचे भविष्य घडवू शकतात, असेही ते म्हणाले. बाबासाहेबांनी अनेक अडचणींवर मात करून जगातील सर्वोच्च शिक्षण घेतले व ते समाजासाठी वापरले, याची आठवण करून देत त्यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचा आदर्श समोर ठेवून जिद्दीने पुढे जाण्याचे आवाहन केले.



मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी ७०व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना सोप्या व सुलभ भाषेत समजावून सांगितली. बुद्धांनी सारनाथ येथे पहिले प्रवचन देऊन धम्मचक्र गतिमान केले, तर बाबासाहेबांनी नागपूर येथे त्याच धम्मचक्राला पुन्हा गती दिली, म्हणून या दिवसाला धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हटले जाते, असे त्यांनी स्पष्ट केले. बुद्धांची शिकवण असलेले करुणा, मैत्री, अहिंसा, सत्य व शील ही मूल्ये विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात अंगीकारावीत, असे ते म्हणाले. पंचशील म्हणजे चांगले जीवन जगण्याचे पाच नियम असून त्यांचे पालन केल्यास समाजात शांतता व सलोखा नांदतो, असेही त्यांनी सांगितले. आई-वडील व शिक्षकांचा आदर करणे, सर्वांशी प्रेमाने वागणे, अंधश्रद्धा व भेदभाव टाळणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे यावर त्यांनी विशेष भर दिला. बाबासाहेबांच्या विचारांवर चालूनच संविधानातील समता व बंधुतेची मूल्ये प्रत्यक्षात आणता येतील, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील चौधरी, हर्षल पगारे, किरणकुमार सोनवणे, विजय पाटील, साहेबराव शिंदे, शितल घुगे, वैशाली बागुल आढाव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी कु.मोनिका मगरे व कु..ऋतुजा आळींग यांनी प्रभावीपणे केले, तर वैशाली बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले. संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना बुंदी वाटप करण्यात आली.

अदम्य जिद्द

ज्योतिर्मय साहित्य


भारतरत्न डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचे अनमोल विचारधन

हू आइ ऍम ?
आइ वेर टू नो..
व्हेर आइ ऍम ?
आइ वॉन्ट टू फाईन्ड.
हाउ आइ ऍम ?
आइ वॉन्ट टू फील,
व्हॉट आइ कॅन डू,
आइ वॉन्ट टू शो.
हाउ आइ विल ?
आइ नो !

खरंच!किती सार्थ आहेत या ओळी मी या शब्दात खूपच सामर्थ्य आहे. अशावेळी आपल्या भाम्याला दोष देता कामा नये. कारण भविष्यात काय घडणार आहे हे ठरलेले नसते. आपणच आपल्या जीवनाला कसा आकार दयायचा है ठरविले पाहिजे. मीच आहे माझ्या जीवनाचा शिल्पकार हे सुवचन अभिमानाने सांगितले पाहिजे. माणूस स्वप्ने पाहतो ती सत्यात उतरविण्यासाठी मात्र धडपडत नाही. कारण त्यांचा ग्रहच झालेला असतो की, स्वप्ने ही स्वप्नेच राहतात. ती पाहून फक्त गप्प बसायचे असते. आपल्याला हा संकुचित विचार सोडून स्वप्नाकडून सत्याकडे जाणारा मार्ग अस्तित्वात आहे. आपले ध्येय आकाशासारखे विस्तृत असले पाहिजे. क्षितिजापलीकडे झेपावण्याची शक्ती आपल्यातच आहे हे आपण भव्यदिव्य स्वप्न ! भारताला समृद्ध व विकसित देश होण्या -साठी खारीचा वाटा उचलणं आवश्यक आहे असे एक शिक्षक या नात्याने सदैव ज्यांच्यामुळे वाटते ते डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम. सुप्रिया वकील यांनी अनुवादित केलेले अदम्य जिद्ध हे कलाम यांचे विचारधन विविध प्रसंगी, भाषणे, संवाद, चर्चा यांचे संकलन आहे.

पुस्तके सांगतात गोष्ट
वाहून गेलेल्या दिवसांची युगायुगांची
विश्वाची;
माणसांची
कालची-आजची-उदयाची
एका एका क्षणाची।

वाचनाचे महत्व अफाट आहे. वाचनाने आपले व्यक्तिमत्व अधिक समृद्ध होते. वाचनाने मनुष्य बहुश्रूत होतो. आपले ज्ञान व प्रगती या दोहोंना द्विगुणित करण्याचे कार्य वाचन करते. वाचायला सुरुवात करा मग पोहोचाल नेमक्या ठिकाणी... अशी ही पुस्तके संकटसमयी खरे मित्र बनून धीर देण्याचे कार्य करतात. थकलेल मन पुस्तकात हरवतं, दुःख विसरतः नाउमेद झालेल्या जीवनालाही जगण्याची उभारी पुस्तके देतात. चांगला ग्रंथ हाती येणं आणि तो आपल्याजवळ असणं ही जीवनातील चिरस्थायी समृद्धी आहे. डॉ. कलाम सांगतात जेव्हा जेव्हा माझ्यासमोर काही समस्या उभी ठाकते, तेव्हा तेव्हा मी पुस्तक उघडतो आणि ते माझे अश्रू पुसतं. ते ग्रंथा विषयी तरुणांना



सांगताना म्हणतात;

ग्रंथ सदैव माझे मित्र होते
गेल्या पन्नास वर्षाहून अधिक काळ
ग्रंथांनी मला स्वप्नं दिली
स्वप्नांमधून जीवितध्येये गवसली
ग्रंथांनी मला ध्येयपूर्तीसाठी
आत्मविश्वासानं सज्ज होण्यास साहाय्य केलं.

म्हणूनच मी माझ्या तरूण मित्रांना सांगतो,

ग्रंथांशी मैत्री जोडा, ग्रंथ तुमचे उत्तम मित्र असतात.

''वाचाल तर वाचाल'' डॉ. आंबेडकरांनी अनेक ग्रंथाचे वाचन करून ही उक्ती सर्वश्रेष्ठ केली. विवेकानंद, वि.दा. सावरकर यांनी देखील वाचनाचा संदेश सर्वसामान्यापर्यंत पोहचविला. डॉ. कलाम यांना एका तरुणाने प्रश्न केला. सर, आपण अनेक पुस्तके वाचलीत आपल्या आयुष्यात प्रश्न, संकट अनेक आलीत तेव्हा तुम्हांला अशावेळी प्रभावित करणारे पुस्तक कोणते? यावर त्यांनी तीन पुस्तकांचा उल्लेख किला. पहिल पुस्तक लाइट फ्रॉम मेनी लॅम्पस! दूसरी रचना थिरुवल्लूवर यांनी लिहिलेल्या १३३० काव्यपंक्ती असलेले थिरूकुरल आणि तिसरे पुस्तक मॅन द अननोन नोबेल सन्मान प्राप्त अलेक्सिस करेल यांच वैदयकशास्त्रावर आधारित पुस्तक. या पुस्तकांचा उल्लेख करण्याचे कारण जेव्हा या त्यांच्या पुस्तक ज्ञानाविषयी वाचले तेव्हा मलाही उंच भरारी घेण्याचा विचार त्याक्षणी आला, भारावून त्यांच्या पुस्तकांकडे वळले आणि हातात पडले आत्मविश्वास जागवणार पुस्तक अदम्य जिद्द

स्फूर्तिदायी व्यक्तित्वे या भागात माझी आई यावर केलेले लेखन साने गुरुजींच्या मनातील आईविषयीचे प्रेम याचीच झलक दिसते.

आई माझा गुरू । आई कल्पतरू।
सौख्याचा सागर । आई माझी ।।

खडतर परिस्थितीत जीवन कंठत असताना सगळ्या गोष्टींची चणचण भासत असताना आजी आणि आई यांनी घरातलं वातावरण सुख आणि दुःख यांदरम्यान कसे हिंदोळत असायचं याचे वर्णन डोळ्यात अश्रू आणणारे आहे. वर्तमानपत्र विकून घरी न्याहरी करण्यासाठी गेल्यावर ममतेने इतरांपेक्षा जास्त वाटणी

देत असे कारण कलाम अभ्यास आणि काम दोन्हीं काम करत. एकदा आई त्यांच्या पानात चपात्या वाढत होती कलाम जेवत होते. जेवणानंतर मोठ्या भावाने बोलावून चांगलंच चोपल,



''कलाम, काय झाल कळलं का तुला ? तू चपात्यामागून चपात्या खात राहिलास आणि आई तुला वाढतच राहिली. तिनं तिच्या वाट्याच्या सगळ्या चपात्या तुला वाढल्या. सध्या दिवस बिकट आहेत. तू जबाबदार मुलासारखे वाग, तुझ्या आईला उपासमार घडवू नकोस.'' हे ऐकल्यावर त्यांच्या अंगाला कंप सुटला स्वतःला आवरू शकले नाही धावत जाऊन आईला मिठी मारली. आपल्या आईची कहाणी सांगताना खालील ओळींची आठवण होते. कलाम लिहितात,

*माझं विश्व फक्त तुलाच ठाऊक होतं आई।

*माझी आई !
मध्यरात्रीच्या वेळी मी जागा झालो
माझ्या गुडघ्यावर तुझे अश्रू टपटप ओघळत होते
तुझे प्रेमळ हात, हळुवार स्पर्शानं वेदना पळवून लावणार
तुझं प्रेम, तुझं काळजी घेणं, तुझा विश्वास यांनीच तर मला सामर्थ्य दिलं ।

आई प्रेमाचं प्रतीक होती, सर्वात महत्वाच ती देवी स्त्री होती. स्त्रीत्व ही परमेश्वराची एक सुंदर निर्मिती आहे. मला दोन थोर महिलांच्या आठवणीनं सदैव स्फ ूर्ती व नवजीवन लाभते. त्या म्हणजे-

*एक माझी आई आणि दुसऱ्या, भारतरत्न एम.एस. सुब्बलक्ष्मी.

भारतरत्न सुब्बलक्ष्मी, कर्नाटकी संगीताची जननी ! मी त्यांना ऐकले १९५० साली तिरूवैयरला त्यागराज महोत्सवात त्यावेळी कलाम महाविदयालयीन शिक्षण घेत होते. **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559